
३ ऑगस्ट ६८ । ४० पैस

# माणूस



गुळगुळीत कागदावर रंगीबेरंगी बुळबुळीत मजकूर छापून लोकांचे रंजन करणे हे काही वर्तमानपत्रकर्त्यांचे मुख्य कर्तव्य नव्हे.

¤

ओसाड मुलुखाची वसाहत, जिंकलेल्या लोकांचे नामर्द शिक्षण देऊन शक्तिहरण व परमुलुखातील प्रजेला कर्जबाजारी बनवून आपले कह्यात आणण्याचा मारवाडी कावा, हे तिन्ही मार्ग सुधारलेल्या राष्ट्रांचे आपले साम्राज्य वाढविण्याचे राजरोस ठरलेले उपाय आहेत.

¤

मराठी राज्यात ब्राह्मणांची बुद्धि व क्षत्रियांचे युद्धनैपुण्य यांचे जसे ऐक्य झाले तसे चतुर आणि धाडसी वैश्य जातीचे सहाय्यही मिळाले असते तर सुरत, वसई, गोवा, मद्रास, हुबळी येथील वखारी कधीच तेथे टिकल्या नसत्या व पुढील इतिहासही वेगळा झाला असता.

¤

सरकारचा खरा शत्रू ज्ञान होय.

¤

ज्ञान केव्हाही गरीब नसते.

¤

आपण मजूर लोक राजे होता व आता रंक झाला आहात पण मजूर लोकांना राजे व्हावयाचे दिवस यावयाचे आहेत— ते खात्रीने येतील असे मी सांगतो.

¤

आशिया खंडाच्या भावी स्थितीचा विचार हिंदुस्थानच्या राजनीतीचा पाया होय.

¤

विश्वासघातकी म्हणून जगात वावरण्यापेक्षा मृत्यू काय वाईट? या ताईमहाराजांच्या खटल्यात मृत्यु आल्यास तो मी आनंदाने पत्करेन, पण खटला मध्येच सोडून विश्वासघातकी म्हणवून घेऊन जगात राहणे कालत्रयीही पत्करणार नाही.

¤

तुमच्या कर्माप्रमाणे तुम्हांला फळ मिळेल ही कल्पना हिंदुधर्मातील असून ती जगभर पसरेल. हे सोने (ही कल्पना) येथील बाजारात लोखंड समजले जात असून सध्या पाश्चात्यांच्या बाजारात त्याची किंमत होत आहे !

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : दहावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

**संपादक**
**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

---

**स. न.** जुलै, २२

दि. १९ जुलैच्या अंकावरील मुखपृष्ठ व श्री. गो. नी. दांडेकरांचा, "महानिर्वाण यात्रा एका वैष्णवाची" हा लेख फार आवडला. — **विजयकुमार जतकर**, उमदी

**स. न.** जुल, १८

नेपाळची भ्रमणगाथा क्रमश: सुरू केल्याबद्दल आपले व भ्रमण करणारे व आपले अनुभव प्रभावीपणे कथन करणारे लेखक श्री. प्रकाश गोळे यांचे हार्दिक अभिनंदन ! अशा प्रकारचे निसर्गशोभा, सामाजिक परिस्थिती व राजकारण यांच्याशी एकरूप होऊन लिहिलेले लिखाण क्वचित वाचायला मिळते. — **प. वि. पटवर्धन**, पुणे

**स. न.** जुलै, १९

'रूपवती भार्या शत्रु:' ही लेखमाला अत्यंत चित्तवेधक वाटली. तसेच 'गुऱ्हाळा'ची गोडी काही और आहे. — **चंद्रकांत जामदार**, माळीनगर

**स. न.** जुलै, १८

दिवसेंदिवस 'माणूस'चे स्वरूप अधिकाधिक खुमासदार व आकर्षक होऊ लागले आहे. 'रातराणी' हे सदर विशेष वाचनीय आहे. — **एक वाचक**, मुंबई

---

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

# भारतीय नेतृत्वा ~ एक हो !

**सु. ल. सोमण**

भारतातील वरिष्ठ राजकीय नेते मधनं मधनं बरीच सत्यं सांगून जातात. सातआठ दिवसांपूर्वीच पंजाबात विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात बोलताना केंद्रीय गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण म्हणाले की, "भारताची अन्य देशांशी मैत्री, भारताचे सामर्थ्य, स्वयंपूर्णता व स्वयंसिद्ध असणे ह्यावरच अवलंबून आहे. रशियासारखी राष्ट्र भारताला सहाय्य देतात, कारण भारताला आंतरराष्ट्रीय राजकारणात काही एक विशिष्ट स्थान आहे; आणि हे स्थान इथून पुढ भारताच्या सामर्थ्यावर, स्वावलंबनावर अवलंबून राहणार आहे." 'वास्तविक नेमकं हेच, स्वातंत्र्योत्तर काळात अनेक विरोधी नेत्यांनी वेळोवेळी सांगितलं होतं, पण त्या वेळी भारताचं सामर्थ्य वाढवायच्या गप्पा चेष्टेचा विषय होता. शांततेचा जप सर्वत्र फार मोठ्या प्रमाणात होत होता, पण त्याच वेळी एक गोष्ट मात्र साफ विसरली जात होती की, राष्ट्राराष्ट्रांतील शांततादेखील ती दोन्ही राष्ट्रं समर्थ असली तरच राहू शकते. दरिद्री, कर्जबाजारी, दुबळ्या व सर्वच बाबतीत परावलंबी असणाऱ्यांना शांततामय जीवनाचा अधिकार, त्यांच्या नित्य अपमानाशिवाय, प्राप्तच होऊ शकत नाही हे एक कट असलं तरी शाश्वत सत्य आहे. स्वातंत्र्यापासून भारतानं अफाट योजना आखल्या, बेलगाम कर्जाखाली राष्ट्राला दडपलं, जडोद्योगांच्या ध्यासानं परावलंबनाचा लगाम राष्ट्राभोवती घट्ट आवळला आणि शेतीकडे संपूर्ण दुर्लक्ष केलं. परिणामत: धनको राष्ट्रांचा भारतावरील दबाव सातत्याने वाढत राहिला. अमेरिकन गव्हाच्या मोबदल्यात रुपयाचं अवमूल्यन भारताच्या माथी बसलं हे उघड सत्य आहे. इम्रे नाज प्रकरणापासून तहत १९६५ च्या काश्मीर संग्रामातल्या रशियन तटस्थेपर्यंत आमच्यावर सतत दडपण येतच गेलं. दुबळ्या, असमर्थ राष्ट्रावर सतत दडपण येतच राहतात; शेजारी, पाजारी त्याच्या भूभागाचे लचके तोडायला टपूनच असतात. धनको मित्रदेखील ऋणको राष्ट्राची त्याची गरज संपली की त्याचा विश्वासघात करायला सतत तयार असतातच. दोन साम्यवादी "भाई भाई" मित्रांनी केलेली कृत्यं, चिनी आक्रमणाच्या वेळी अरब राष्ट्रांनी स्वीकारलेलं मौन, पाकिस्तानी आक्रमणाचे वेळी जगातील यच्चयावत– मलेशिया अपवाद– राष्ट्रांनी स्वीकारलेली अलिप्तता, कच्छ प्रकरणातलं लंडनचं व ६५ साली काश्मीर प्रकरणात रशियाचं दडपण, रुपयाचं अवमूल्यन, धनको राष्ट्रांकडून वेळोवेळी झालेली आर्थिक नाकेबंदी व आर्थिक नाकेबंदीच्या धमक्या– ह्या साऱ्या घटना आमचं दौर्बल्य, आमचं परावलंबित्व, आमच्या आंतरराष्ट्रीय धोरणाचं अपयश बोलून दाखवणाऱ्या आहेत !

आज हे आठवायचं कारण म्हणजे, पुन्हा एकदा आमच्या राष्ट्रीय अस्मितेला भारताचा सच्चा मित्र म्हणवल्या जाणाऱ्या रशियाकडून मिळालेले आव्हान ! रशिया पाकिस्तानला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणार आहे हे वृत्त बाहेर आल्यापासून देशात चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. लोकसभेच्या अधिवेशनाचा पहिला दिवस ह्याच प्रश्नानं गाजला. महामंत्र्यांपासून जवळजवळ सर्वच नेत्यांनी – अर्थात कम्युनिस्ट (त्यांच्यामागे 'भारतीय' हे उपपद का लावावं हेच कळेनासं झालंय) सोडून– रशियाच्या निर्णयाविषयी नापसंती व्यक्त केली आहे. "भारत बलशाली राष्ट्र बनावं असं जगातल्या कुठल्याच राष्ट्राला वाटत नाही." असं श्रीमती इंदिरा गांधी परवा ह्या संबंधात बोलताना म्हणाल्या. "भारताचं परराष्ट्र धोरण व्यवहार्य नाहीं. भारताच्या हिताच्या उदात्त हेतूने सोविएत रशियाने आपले परराष्ट्र धोरण आखावे अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे." असं श्री. स. का. पाटील मुंबईतल्या एका भाषणात परवा म्हणाले, "भारताच्या राष्ट्रीय हिताला बाधक ठरणारं कोणतंही कृत्य अमैत्रीचं गणलं जाईल व त्याची योग्य दखल घेतली जाईल," असं आश्वासन केंद्रीय नेते वेळोवेळी देतात. पण प्रत्यक्षात इतकं कणखर धोरण स्वीकारण्याची शासनात कुवत नाही. असं दिसतं. एरवी, रशियाच्या निर्णयावर लोकसभेनं नापसंती व्यक्तवून भारतीय जनमताचं प्रतिनिधित्व करायला महामंत्र्यांनी नकार द्यायला नको होता. पण अद्यापही आम्ही वास्तववादी व प्रखर राष्ट्रीय दृष्टिकोन स्वीकारू शकत नाही हेच खरं. स्वावलंबनाचा, अन्नस्वतंत्रतेचा घोषा रोज होतोय, पण पावलं मात्र त्या वाटेवर वळताहेत असं कुठंच दिसत नाही. कै. शास्त्रींच्या काळात किंचित आशा वाटू लागली होती, पण दुर्दैवाने त्यांची कारकीर्द अतिशय लहान ठरली. शास्त्रीजी गेले. आणि 'जय जवान – जय किसान' ही फक्त घोषणाच राहिली, प्रत्यक्षात मात्र मंत्रिपद आणि काळा पैसा, खरे तमाशे आणि राजकारणाचे तमाशे, अमेरिकन गव्हाची आयात आणि परकीयांची वैचारिक गुलामगिरी ह्याच गोष्टीचं अफाट पीक आलं !


## पाकचा राजनैतिक विजय

वास्तविक, रशियनांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्रं पुरवावीत किंवा नाही हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. रशियनांनी तसा निर्णय घेतला ही त्यांची चूक मुळीच नाही. आमच्या धोरणाचा पाठपुरावा रशियाने आजतागायत सातत्याने केला, पण आज त्याला तो तसा करावासा वाटत नाही. ह्याचा उघड अर्थ हाच की, भारताची भूमिका रशियाला पूर्णपणे मान्य नाही. आणि हा दोष रशियाचा नव्हे तर आमचा आहे. कारण आमची भूमिका आम्ही रशियाला पटवून देऊं शकलो नाही. रशियाजवळ पाकिस्तानचं प्रतिनिधित्व अधिक प्रभावीपणे झालं व त्यामुळेच पाकिस्तानला शस्त्रास्त्रांची मदत मिळाली हा पाकचा भारतावरील राजनैतिक विजयच म्हटला पाहिजे. परंतु मुख्य प्रश्न आहे तो हा की, रशिया–अमेरिकेच्या धोरणावर आम्ही किती काळ

अवलंबून राहणार आहोत ? त्या दोन्ही राष्ट्रांच्या निर्णयांची, त्यांची तमा न बाळगता आम्ही आमचे निर्णय कधी घऊच शकणार नाही का ? का त्यांच्या विरोधात जाऊनही राष्ट्र तारून न्यायचा आमच्या राष्ट्राचा निर्धार नाही ? आमच्या राष्ट्राचा निर्धार नाही असं म्हणणं धाष्टर्याचं, भारतीय जनतेवर अन्याय केल्यासारखं होईल. चिनी आणि पाकिस्तानी आक्रमणांच्या वेळी जे राष्ट्र देशद्रोही कम्युनिस्टांना आणि पाकधार्जिण्या मुस्लिमांना बाजूला सारून, आक्रमणांच्या विरोधात एकदिलानं उभं राहिलं, त्या राष्ट्रात, त्या भारतीयांत निर्धार नाही असं कोण म्हणेल ? दोष आहे, बिघाड आहे तो आमच्या नेतृत्वात. आमच्या नेतृत्वांत निर्धार नाही, हेच खरं ! उत्तर विएटनामसारखं छोटसं राष्ट्र बलाढ्य अमरिकनांशी यशस्वी झुंज घेऊ शकतं, प्रचंड रशियन सामर्थ्याने सुसज्ज असलेल्या अरबांना चिमुकला इस्त्रायल खडे चारू शकतो, ते केवळ राष्ट्राच्या प्रखर निर्धाराच्या जोरावर ! तिथलं नेतृत्व आणीबाणीच्या वेळी सारे मतभेद दूर सारून एकोप्यानं परराष्ट्राविरुद्ध झुंज घेतं, जनता एकदिलाने त्यांच्यामागे उभी ठाकते आणि एक इतिहास निर्माण करून जाते ! उत्तर विएटनाम, इस्त्रायलसारख्या चिमकुल्या राष्ट्राला हे सहजशक्य होतं, मग भारताला का शक्य होऊ नये ? इथे तर आणीबाणीच्या काळात पक्षभद, प्रांतीयता, जातीयता, धर्म – सारंसारं विसरून जनता प्रतिकारार्थ सिद्ध असते, पण नेतृत्वच नेहमी विभागलेलं असतं. राष्ट्राला एकात्मतेचे धडे देताना स्वतः नेतृत्व मात्र कधीच एकोप्यानं काम करीत नाही हाच नेहमीचा अनुभव येत असतो. भारतीय नेतृत्व नेहमीच थिद पटत आलं आहे !

आजही पुन्हा तेच घडत आहे. रशियाची कृती बहुशः सर्वांनाच–कम्युनिस्ट सोडून–आवडलेली नाही. पण तसं एकदिलानं लोकसभेच्या वतीनं रशियाला ऐकवायला मात्र सर्व नेत्यांची संमती नाही. ही बेकी आज गाडली पाहिजे. नेते ती टाळू शकत नसतील तर जनतेनं नेतृत्व बदललं पाहिजे. नेतृत्वानंही आपली जबाबदारी ओळखून, ह्या प्रश्नाचं राष्ट्रीय अस्मितेला असलेलं आव्हानात्मक स्वरूप लक्षात घेऊन, ह्या प्रश्नावरची प्रतिक्रिया संपूर्ण एकमतानं, एकसुरानं व्यक्तविली पाहिजे किंवा रशियन धोरणविषयक कुठलाही ठराव न मांडता येईल त्या परिस्थितीत वाटेल ते आव्हान स्वीकारायला राष्ट्र सिद्ध आहे हे जगाला खडसावून सांगावं आणि तसं वागण्याचं निःसंदिग्ध आश्वासन देशाला द्यावं ! काहीही करा पण एकदिलानं, एकमतानं करा हेच नेतृत्वाला सांगायची आज खरी आवश्यकता आहे ! हा प्रश्न काँग्रेसचा, जनसंघाचा, प्रसोपाचा, संसोपाचा, स्वतंत्रांचा–कुणाचाही नाही !

**शेवटी जाता जाता वृत्तपत्रांतली एक बातमी सहज, वाचकांच्या माहितीकरिता उद्धृत करतो– " रशियाच्या १९६७ च्या जागतिक ॲटलासमधील नकाशात अक्साईचीन, नेफातला काही प्रदेश वगैरे बराचसा भाग चीनचे भाग म्हणून दाखवला आहे. "** ○



## □ झोपी गेलेला जागा झाला त्याची गोष्ट

महाराष्ट्र विधानसभेचे पावसाळी अधिवेशन नुकतेच सुरू झाले. या अधिवेशनात घडलेली एक महत्त्वाची घटना तुम्हाला कळली असेलच. एका बिनसरकारी ठरावावर चर्चा चालू असताना एक काँग्रेस आमदार बसल्या जागीच झोपी गेल्याचे आढळून आले. आमदार कृष्णा देसाई यांनी या निद्रिस्त आमदाराकडे सभागृहाचे लक्ष वेधले. ते म्हणाले, "हे पाहा, इथे एक काँग्रेस आमदार झोपी गेले आहेत. ते जागे होईपर्यंत गृहाचे कामकाज तरी तहकूब ठेवावे किंवा त्यांना झोपण्यासाठी वेगळी जागा तरी द्यावी."

या बोलण्यामुळे सभागृहात हशा पिकला म्हणतात. पण एवढ्या मोठ्या हशाच्या कल्लोळानेही हे शेषशाई भगवान (की लोकशाही भगवान ?) जागे झाले नाहीत ही समाधानाची गोष्ट होय. शेवटी म्हणे शेजारी बसलेल्या दुसऱ्या काँग्रेस आमदारांनी जरा शुकशुक केले तेव्हा कुठे हे झोपी गेलेले आमदार जागे झाले आणि गृहाबाहेर निघून गेले.

आता मला हे कळत नाही की, एखादा आमदार विधानसभेत झोपी गेला तर त्याचा एवढा बोभाटा कशासाठी ? झोपण्याची क्रिया ही काय अनैसर्गिक गोष्ट आहे काय ? माणसाला झोप ही येणारच. त्यातूनहि दमलेले माणूस पट्दिशी जिथे जागा असेल तिथे पडणार. याबद्दल एवढा आरडाओरडा कशाला ? काही झाले तरी तो लोकप्रतिनिधी आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. लोकप्रतिनिधीने लोकांसारखेच वागायला नको काय ? आज सगळे लोक जर झोपी गेलेले आहेत तर त्यांच्या प्रतिनिधीनेही झोप काढलीच पाहिजे. लोकांच्या आकांक्षांशी समरस होणे हे लोकप्रतिनिधीचे कर्तव्यच आहे. मी तर म्हणतो, जनता झोपलेली असताना स्वतःही झोप काढणारा हा आमदार हाच खरा जनतेचा प्रतिनिधी. खरे म्हणजे बाकीचे जागे असतात हेच जरा चमत्कारिक आहे. मागे एकदा मुंबई विधिमंडळ असताना जादा काम संपविण्यासाठी रात्री-बेरात्रीपर्यंत कामकाज चालायचे. एकदा भाई डांगे बोलायला उठले तेव्हा जवळजवळ सगळी मंडळी झोपली होती. त्यांना उद्देशून भाई डांगे सभापतींना म्हणाले, " महाराज, या निद्रिस्त लोकशाहीला आधी जागे करा. मग मी भाषणाला सुरुवात करतो ! " ... ही

निद्रिस्त लोकशाही अखेर जागी झाली की नाही आणि जागी झाली असल्यास किती वेळ जागृत होती हे काही मला माहीत नाही. पण त्या वेळचे आमदारांचे वर्तन हे खऱ्याखुऱ्या लोकप्रतिनिधीला शोभणारे झाले यात काही शंका नाही !

जाऊ द्या. एखाद्या बिचाऱ्या कॉंग्रेस आमदाराने जरा डुलकी घेतली तर त्याचाच एवढा गवगवा का, मी म्हणतो ? सभागृहातल्या हशाच्या कल्लोळानेही त्यांची झोप चाळवली नाही याचे काही कौतुक कराल की नाही ? ही गाढ झोप काय सुचवते हे कधी विरोधी पक्षांच्या लक्षात आले का ? या तुमच्या भाषणात काही अर्थ नाही, असाच याचा अर्थ नाही का ? विरोधी पक्षाचा हा प्रतीकात्मक निषेधच होता असे मी म्हटले तर त्यात काही चूक ठरेल का ? विरोधी पक्षांची टीका विधायक असावी असे प्रत्येक मंत्रीमहोदय कळवळून सांगत असतात. निदान कॉंग्रेसवाल्यांना जागे ठेवण्याइतकी तरी ती जिवंत असावी. कंटाळवाणी, रटाळ तेच तेच आरोप सरकारवर करणारी ( —" सरकार बेफिकीरच आहे. जनतेच्या हिताची कसलीही गोष्ट करतच नाही, वशिलेबाजीच चालू आहे, काळा बाजारच होतो आहे, अधिकारी पैसेच खातात ... अहो, नेहमीचेच आरोप हे ! ) असली भाषणे चालू झाली तर कॉंग्रेस आमदारांनी काय जागे राहावे ? धन्य आहे बुवा तुमच्या अपेक्षांची ! मी तर म्हणतो, सभापतींनी अगदी कायदेशीर झोपण्याची परवानगी देऊन टाकावी. अगदी डोक्यावर पांघरुणे घेऊन. विरोधी पक्षाच्या सदस्यांचे आवेशपूर्ण भाषण चालू आहे आणि इकडे सरकारपक्षाच्या बाकावर बहुसंख्य मंत्री आणि आमदार तोंडावर पासोडी घेऊन झोपलेले आहेत असे दृश्य उद्या दिसले तर किती छान दिसेल ! हां, एक अट असावी. झोपायला परवानगी दिली तरी कुणी घोरू नये आणि दुसऱ्या आमदाराच्या मांडीची उशी करून पडू नये. असला आराम मात्र हराम है !

## □ हरवली ! हरवली ! सरकारी फाईल हरवली !

काय एकेक विचित्र स्वप्ने पडतात एखाद्या वेळी !

परवा रात्री झोपताना वर्तमानपत्रे चाळत होतो. मी वर्तमानपत्राचा उपयोग रात्रीच करतो. सहज बातमी वाचली की नागरी वाहतूक खात्यातली एक सरकारी फाईलच हरवली. सरकारी मालकीची दोन हेलिकॉप्टर्स विकून टाकावीत असा हुकूम मा. यशवंतराव मुख्यमंत्री असताना त्यांनी दिला होता. हा हुकूम असलेली फाईलच बेपत्ता आहे. ही हेलिकॉप्टर्स का विकली गेली नाहीत याची चौकशी सुरू झाल्यावर कळले म्हणे, की ही फाईल गडप !

बातमी वाचीत वाचीतच मी झोपी गेलो. कसा तो विषय डोक्यात राहिला कुणास ठाऊक. पण मोठे चमत्कारिक स्वप्न पडले. निरनिराळ्या वर्तमानपत्रांचा ढिगारा पडलेला आहे अन् मी त्यातल्या जाहिराती वाचतो आहे असले काहीतरी

स्वप्न होते. पहिलीच जाहिरात होती —

## हरवल्याचा शोध

'नागरी वाहतूक फाईल' या नावाची आमची दहाबारा वर्ष वयाची फाईल एकाएकी घरातून निघून गेली आहे. अंगात पाच-पन्नास पिवळे पांढरे कागद, बाहेर काळसर कव्हर, वर 'अर्जंट' अशी तांबडी टोपी असा तिचा पोषाख आहे. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या सहीचा कागद ही जन्मखूण कोणासही ओळखता येईल. तरी ज्याला कुणाला ही फाईल भेटेल त्याने ती आमच्या घरी आणून पोचती करावी. अथवा पत्राने खबर द्यावी. जाणे येणेचा खर्च देऊन वर बक्षिशी देऊ.

**चिरंजीव नागरी वाहतूक फाईल हीस**

तू गेल्यापासून तुझे वडील वसंतराव नाईक यांनी अंथरुण धरले आहे. खात नाहीत, पीत तर कधीच नाहीत व बोलतही नाहीत. तू परत आल्यावर आम्ही कुणी तुझ्यावर रागावणार नाही. खर्चास पैसे हवे असल्यास ताबडतोब पत्रान कळवणे. म्हणजे पुरवणी बजेटात मंजूर करून घेऊ. तुझी आई कमांडंट माणिकबाई एकसारखी डोळयांत प्राण आणून तुझी वाट पाहत आहे. तरी लवकर लवकर ये.

तुझा,

**प्रसिद्धी संचालक**

दुसरे वर्तमानपत्र उघडले. दुसरी जाहिरात वाचली—

## मंत्री हरवले

"......या राज्याचे मंत्री श्री. आयाराम गयाराम पक्षांतरवाला हे कालपासून हरवले आहेत. काल रात्री जनता-संपर्क साधण्यासाठी ते राजधानीतील एका बोळकंडीत एकटच गेले होते. रात्री नऊ वाजता तेथील एक माडी चढत असताना त्यांना विरोधी पक्षाच्या एका पुढाऱ्याने दुसऱ्या एका माडीतून पाहिले. त्यानंतर त्यांचा पत्ता नाही. वयाने सर्वांत लहान असे ते मंत्री असल्यामुळे कोठेतरी चुकले असावेत असा तर्क केला जात आहे. पोलिसात खबर दिली आहे. मोठ्या हमरस्त्याने जाण्याची सवय नसल्यामुळे पुन्हा त्यांना सचीवालय सापडेल की नाही याची शंका आहे. सर्व डाकबंगले, सर्किट हाऊस कांग्रेस कमिटयांच्या माड्या, नटयांची घरे, साथीची इस्पितळे इ. ठिकाणी कसून शोध करण्यात आला. पण अजूनही त्यांचा प्रशस्त

पार्थिव देह कोठे विसावलेला दिसला नाही. त्यांच्या अंगात शुभ्र खादीचा कुडता आणि खादीचेच धोतर आहे. (धोतराबद्दल नक्की खात्री नाही.) डोक्याला पांढरी टोपी आहे. कुणीही दिसल्यास लगबगीने नमस्कार करण्याची त्यांची लकब कोणाच्याही चट्दिशी ध्यानी येण्यासारखी आहे. अशा वर्णनाचा संशयित इसम कोठे दिसल्यास त्यास हटकावे. ताबडतोब पोलीस चौकीत वर्दी द्यावी. ( मात्र चौकीत पोलीस आहे याची आधी खात्री करून घ्यावी. असो.)

**चिरंजीव आयाराम यास**

तू पक्ष सोडून निघून गेल्यापासून आपल्या पार्टीचे सगळे लोक फार दुःखी झाले आहेत. मुख्य मंत्र्यांनी डोळे पांढरे केले असून गृहमंत्र्यांनी अंथरुण धरले आहे. कसेही करून परत ये. तू पक्षांतर केलेस तरी आम्ही कुणी रागावणार नाही. नवे आलिशान हॉटेल बांधायला पैसे कमी पडत असल्यास निःसंकोचपणे कळव. पैसे पाठवून देऊ. पण कसेही करून अविश्वासाचा ठराव येण्याच्या आत परत पार्टीत ये.

**तुझाच**

**गंगादास जमनादास**

व्हिप, सरकारी पार्टी ......

तिसरे वर्तमानपत्र उघडले. पुन्हा दिसली ती जाहिरातच—

**' सरकार हरवले ! '**

इथेच स्वप्न तुटले आणि मी जागा झालो.

काय एकेक स्वप्ने पण पडतात माणसाला !

## □ संगीत आणि गोमाता

जुनागढ जिल्ह्यातील मंगरोळ गावात शारदाश्रम नावाची संस्था आहे. या संस्थेमध्ये गाईंचे संगोपन केले जाते. गाईचें दूध भरपूर मिळावे म्हणून आश्रमातल्या लोकांनी एक शक्कल लढवली. धारा काढायच्या वेळी त्यांनी ध्वनिक्षेपकावरून संगीताच्या रेकॉर्डस् लावल्या. त्याचा असा परिणाम झालाय म्हणता जादूसारखा ! गाई भराभर दूध जास्ती देऊ लागल्या. सध्या या गाई पंधरा टक्के दूध संगीतश्रवणामुळे जास्ती देतात.

काय वाटलं ही बातमी वाचून ? काय संगीताचा प्रभाव आहे. गुराढोरांवरदेखील त्याचा परिणाम होतो म्हणजे काय गंमत आहे नाही ?— असंच काहीतरी वाटलं ना ? ठीक आहे. तुम्हाला तसं वाटणं अगदी बरोबर आहे. कारण मलाहीं थेट तसच वाटतं. माझ्या डोक्यात आणखी काही विचार येतात इतकंच. हे जे

संगीत ध्वनिक्षेपकावरून गाईंना ऐकवण्यात येतं ते कसलं संगीत बुवा? वाद्य संगीत का प्रत्यक्ष गाणं? शास्त्रोक्त संगीत की भावगीत? गाई ज्या अर्थी पंधरा टक्के दूध जास्ती देताहेत त्या अर्थी हे बहुधा भावगीत-गायनच असावं. (जर शास्त्रोक्त संगीत असेल तर ही टक्केवारी इतकी वाढणे शक्य नाही.) भावगीतातला लाडिकपणा, बायकीपणा याचा एवढा सुपरिणाम होईलच, नाही का? 'नका गडे माझ्याकडे पुन्हा पुन्हा पाहू?' — असले गोड गोड गीत ऐकल्यावर पान्हा जास्त सुटला तर त्यात नवल काय? 'चल गं सजणी रानामधे' हे गीत ऐकल्यावर त्यांना आनंदाच्या उकळया फुटणार नाहीत काय? गाई झाल्या म्हणून काय झाले? त्यांनाही भावना, मन आहेच.

शास्त्रीय संगीताचा असा पंधरा टक्के परिणाम होणे कदापि शक्य नाही. त्यातही वाद्यसंगीत असेल तर निदान गाई जागेवर राहतील. पण एखाद्या गवयाची आलापी असेल तर दूध वाढण्याची गोष्ट तर लांबच, उलट दावे तोडून त्या चौखूर उधळण्याचीच शक्यता जास्त. सामान्य माणूसदेखील जिथे या संगीताला बिचकतो तिथे गरीब बिचाऱ्या गाईंची काय कथा! जास्ती दूध देणे तर सोडाच, पण धार काढताना त्या लाथा झाडल्याशिवाय कधीही राहणार नाहीत. काय असेल ते खरे.

संगीताच्या श्रवणामुळे दूध एवढे वाढत असेल तर आणखी काही प्रयोग या बाबतीत करून पाहण्यासारखे आहेत असे मला वाटते. शास्त्रोक्त संगीत आणि सुगम संगीत यांच्यापेक्षा चित्रपट संगीताचा उपयोग नक्कीच जास्ती होईल. त्यातही हिंदी सिनेमातली गीते! सगळे शब्द राष्ट्रभाषेतले असल्यामुळे गाईंच्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता जवळजवळ नाहीच! पण प्रेमगीते आणि तीही बहुधा द्वंद्वगीते—हे हिंदी गाण्याचे वैशिष्टयच असल्यामुळे गाईंना ती आवडतील. त्यांना पान्हा फुटेल. असल्या गाण्याच्या चाली उडत्या असल्यामुळे त्या आनंदात डुलत राहतील. त्या भरात पंधराचे—पंचवीस टक्के होणे अशक्य नाही. सणावाराच्या दिवशी दूध जास्ती हवे असल्यास गोठ्यात 'रेडिओ सिलोन' बिनाका वगैरे कार्यक्रम लावले तर फायदेशीर होईल. निवडक कार्यक्रमामुळे दूधही वेचक मिळेल हा फायदा आपण लक्षात घेतला पाहिजे. समरगीते मात्र शक्यतो टाळावीतच. गाईला भीती वाटणे चांगले नाही. अशाने त्या पान्हा चोरतील आणि त्यांच्याशी 'समर-प्रसंग' खेळायला गवळ्यांना भाग पडेल. आपल्या समरगीतांचे वैशिष्टच हे आहे की, ती ऐकल्यावर आपल्याला जरी त्यांचा फारसा त्रास झाला नाही तरी शत्रू चळाचळा कापल्याशिवाय कधीही राहणार नाही! म्हणून भाकड जनावरांच्या बाबतीतच हा समरगीतांचा प्रोग्रॅम असावा. म्हणजे ती ऐकल्यानंतर भीतीनं, धसक्यानं का होईना, पण त्यांनाही पान्हा फुटेल! आपल्याला काय दूध वाढल्याशी कारण! ○

। वि ज य तें डु ल क र ।

# मदर्स हाऊस

**हे ' घर ' फार चांगले आहे. पण तितकेच अस्वस्थ करणारे आहे.**

मला तुम्ही एकदम विचारलेत की हा ' मदर्स हाऊस ' नामक चित्रपट कसा आहे ? तर मी एका उमाळ्याने सांगेन, फार समर्थ. फार फार चांगला. पण मी तो पुन्हा पाहणार नाही आहे. तो कसा आहे ते जे मला आता कळते आहे ते याआधीच माहीत असते तर कदाचित लांबूनही मी त्याच्या वाटेस गेलो नसतो. तुम्ही जरा बुचकळ्यात पडाल. चांगला आहे– नव्हे, फार चांगला आहे तर मग का नाही परत पाहयचा ? तो पाहिल्याची अंशत: तरी उपरती का ?

मदर्स हाऊस म्हणजे आईचे घर हे झाले शब्दश: भाषांतर. पण आईचे घर म्हणजे जिथे वडील ही संस्था अस्तित्वात नाही आणि सर्व घर एकट्या आईभोवती एकवटले आहे असे एक घर. लंडनच्या उपनगरात असे एक घर आहे अशी कल्पना करा. अव्वल जुन्या पुण्यातले एकेक ' वाडे ' आहेत ना, तेवढे जुनाट. कोंदट, अंधारे. आजूबाजूला झाडी. जरा विरळच घरे. फारसे कोणी या घरी फिरकत नाही. इथे पाठोपाठची सहा भावंडे आणि त्यांची आई राहते. यातले सगळ्यात पिल्लूसे असते ते चार वर्षांचे आणि सगळ्यात मोठी बहीण असते तेरा वर्षांची. आईभोवती ही चिमणी आयुष्ये सर्वस्वाने एकवटलेली असतात. यांची सकाळ उजाडते तीच आईचा हल्कासा पापा घेऊन तिला ' गुड मार्निंग, मॉम ' करण्याने. दिवसभर ती



पामिला फ्रँकलिन । डर्क बोगार्ड

आई लावते ती रीत, ते धार्मिक संस्कार गिरवीत असतात. शाळेला गेली तरी मनांनी आईभोवतीच असतात. रात्री झोपी जातात ती आईला ' गुड नाइट, मॉम करून. आणि त्यांची आई क्षयाने आजारी असते. मृत्युपंथाला लागलेली असते. या पोरांच्या लेखी आई नेहमीच असणारी एक सुखद सवय आहे; आणि आई जाते. गेलेलीच मोठ्या तेरा वर्षांच्या एल्साला आढळते. जे कधी कल्पनेच्या कल्पनेतही या सहा जीवांनी अपेक्षिले नाही ते घडते आणि ही सहा पिल्ले निराधार, पोरकी होतात. धाकट्या विलीला तर मरणे म्हणजे काय तेही अद्याप कळत नाही. तो तसे इतर भावंडांना सरळ विचारतो. पण परिस्थिती गंभीर आहे हे उतरत्या क्रमाने त्या सहांनाही उमजते. ज्यांचे कुणी नाही अशा मुलांना अनाथगृहात धाडतात; पण तिथे जाण्याला तर यांचे मन घेत नाही आणि मोठी एल्सा आणि तिच्या पाठीवरचा ह्युबर्ट एक घाट घालतात. आई गेली हे मुळी कुणालाही सांगायचेच नाही ! तिला ती दोघे बागेत पुरतात. तिच्या वस्तू बागेलगतच्या खोपटात नेऊन व्यवस्थित मांडतात. आईच्या सहवासात असावे तशी तिथे बसतात, बोलतात. शहाण्यासारखी वागतात. कुणी साधादेखील हट्ट म्हणून करीत नाही. आपापली वेणीफणी, कपडे घालणे—काढणे, अभ्यास— शाळा सगळे आई आहेच अशा तऱ्हेने उरकतात. तेरा

वर्षांची मोठी एल्सा त्यांना आई करी ती मदत करते. घरी चुकून कुणी आले तर सगळी एक होऊन 'आई गावाला गेली' असे सांगतात. रात्रीच्या अंधारातल्या त्यांच्या 'आईच्या तासा'ला शहाण्या डोळ्यांची चिटुकली डायना आईच्या झुलत्या खुर्चीत बसून डिट्टो आईसारखी बोलते. हळू हळू, आई तिच्याशी बोलते असेही ती सांगू लागते. प्रत्येक बाबतीत आईचे म्हणणे काय आहे हे इतर पोरे तिला त्या खुर्चीत बसवून ती झपाटल्यागत झूलू-कण्हू लागली की विचारतात आणि ती सांगेल त्या, आईच्या म्हणण्यानुसार वागतात. आईची आज्ञा मोडते म्हणून छोटुकल्या जर्टीचे लांब सुंदर केस इतर पोरे कापतात. जर्टी जिवाच्या आकांताने किंचाळते, नको– नको– पण आईची आज्ञा ती आईची आज्ञा ! जर्टीला नंतर सपाटून ताप भरतो. आईने या परिस्थितीत काय केले असते ? डॉक्टरला बोलवले नसते. कारण स्वत:साठीही तिने अखेरपर्यंत कधी डॉक्टरला बोलावले नाही. डायना आईची इच्छा म्हणून हेच सांगते आणि मोठी पोरे ठरवतात की तर मग डॉक्टर नाहीच आणायचा. जर्टी तापाने बेहोष होते. मोठा ह्युबर्ट तिच्यापाशी कुणी हवे म्हणून स्वत: शाळेला न जाता घरी रहातो. छोटचा बहिणीची तगमग पाहून तो गलबलतो, पण आईची आज्ञा मोडण्याचा धीर काही त्याला होत नाही. योगायोगाने ताप मुदतीचा असतो. तो एक दिवशी औषधाविना उतरतो तेव्हा पोरांना वाटते, आईनेच जर्टीला बरे केले. जर्टी नाहीतरी तिची आवडती होतीच. आईचे आपण सगळेच आवडते आहोत.

दरम्यान आईचे काही पैसे पोस्ट-ऑफिसात ठेवलेले असतात. ते ही पोरे आईची सही करून थोडे थोडे काढतात. त्यावर तेरा वर्षांची एल्सा घर चालवते. निगेविना या पोरांची रया उतरली आहे पण त्यांच्या लेखी आई आहेच. स्वत:ला ती पोरकी मानीतच नाहीत. क्वचित निमित्ताने या घराशी फिरकणाऱ्यांना अचंबा वाटतो, पोरांची आई गेली आहे तरी कुठल्या गावाला ? आणि या एवढचा एवढचा पोरटचांवर घर सोपवून ? पण खरे शोधण्याला मार्ग नसतो. पोरे काही पत्ता लागू देतील तर ना ! त्यांचे आपले एक मख्ख उत्तर: आई; गावाला गेली. जास्त नाही, कमी नाही.


*छत्रपती शिवाजी महाराज व*
*पहिले बाजीराव पेशवे*
या दोघांच्या कालखंडात
कितीतरी वर्षांचे अंतर !
**मग हे एकत्र कसे आले ?**
आश्चर्य आहे बुवा ! ● वाचा तर मग–
**'वसंत'चा स्वातंत्र्य विशेषांक**
सप्टेंबर ६८ : मूल्य २ रु.
**वसंत मासिक, मुंबई ४**
किरकोळ अंकासाठी रु. २·७५ पाठवा.
रजिस्टरने अंक पाठवू.
वार्षिक वर्गणी रु. १५

आणि एक माणूस एक दिवशी अकस्मात घरी उगवतो. आपण आईचा नवरा असे तो सांगतो. संदर्भाने मोठी पोरे ताडतात की आईचा नवरा म्हणजे हा आपला बापच. असे काही कुठे तरी अस्तित्वात असल्याचा पत्ता त्यांना आई गेल्यावर तिच्या कागदपत्रांमुळे लागलेला असतो. मोठा पोरगा जाऊन या बापाला घट्ट मिठी मारतो. पोरे त्याला ' डॅड ' म्हणतात. पण तो म्हणतो, नुसतेच ' चार्ली ' म्हणा, ते डॅड बीड नको. कारण तो मुळी त्या पोरांचा बाप नसताच. ही पोरे झाल्यानंतर कधी तरी ' आई 'च्या आयुष्यात तो आला. पुन्हा चौवाटा निघून गेला. आता भणंग होऊन पुन्हा परत आलेला असतो आणि आईच नसते.

पोरे चार्लीला आई गेल्याचे प्रथमच सरळ सांगून टाकतात. त्याला फारसे वाईट वाटत नाही. तो घर ताब्यात घेतो. पोरांच्यात रमल्याचे दाखवतो. त्यांच्याबरोबर हुंदडतो. पोरेही प्रथम खुशालतात. पण मग चार्लीची हुकूमशाही मोठ्या पोरांना खटकू लागते. त्यात या पोरांविषयीचा ओलावा तर नसतोच पण आईचीही कदर नसते. पाहता पाहता चार्ली आईच्या निर्मळ घराचे स्वतःसाठी विलासगृह बनवतो. पोरांना बनवून आईचे पोस्टातले सर्व पैसे हडप करतो. घरदेखील विकायला काढतो. ही पोरे आणि त्यांची आई यांची उघड उघड अवहेलना करतो. पोरे खवळतात. चार्ली दारू पिऊन घरी येऊन भांडण उकरतो, या पोरांना बिनबापाची, 'बास्टर्डस्' म्हणतो, आईला बाजारबसवी ठरवतो——मोठी एल्सा तगमगून म्हणते, आईविषयी बोलू नकोस तू, चार्ली ! टेर झालेला चार्ली आईची तसबीर भिंतीवरून हिसकून ती लाथांनी तुडवतो, शेकोटीत जाळतो. हे करताना तोंडाला येतील त्या गलिच्छ शिव्या देतो. बेभान एल्सा हाती लागतो तो लोखंडी गज घेऊन चार्लीचा कपाळमोक्ष करते. आपण काय केले ते पोरांच्या लक्षात मग येते आणि सगळी धसकून जातात. तशीच एकमेकात ठरवतात की पैसे संपले; घरही विकले गेले. आता घरात कसे राहायचे ? शिवाय चार्लीचा आपण खून केला हे सुद्धा कुणाला तरी सांगायला हवे. ती घराचे दार अगदी हळूवारपणे लावून घेऊन मुकाट बाहेर पडतात-आईच्या घरातून——कायमची. ' आईचे ' घर आता काळोखात ओकेबोके मागे राहते. पोरांच्या माथ्यांवर उघडे


सोने-चांदीच्या
तसेंच
खड्यां मोत्यांच्या कलात्मक
दागिन्यासाठी.
डी. एस. मालडकर
आणि कं. ज्युवेलर्स
एन. सी. केळकर रोड दादर, मुंबई २८

आभाळ. छोटे पिल्लू चार वर्षांचे नि सर्वांत मोठी ताई तेरा वर्षांची. ना आई, ना बाप, ना घराचा निवारा.

## सहा बोलक्या मुद्रा

असे या चित्रपटाचे चटका लावणारे विलक्षण शोकात्म कथानक. ज्युलिअन ग्लोग यांच्या कादंबरीवर आधारलेले हे कथानक जिवंत करताना दिग्दर्शक जॅक क्लेटन यांनी सहा भावंडांच्या भूमिकांसाठी सहा बोलक्या मुद्रांची, गोजिरवाणी, तरतरीत, अकृत्रिम अभिनय करणारी पोरे शोधूनच अर्धी अधिक लढाई जिंकली आहे. ही विलक्षण पोरे अभिनय करीत नाहीत, भूमिका जगतात. चित्रपटाचा 'मूड' त्यांनी इतका काही पकडला आहे की भल्या भल्या नटांनी थक्क व्हावे ! आरंभीचे त्यांचे निष्पाप, अजाण आयुष्य, आई गेल्यानंतर प्रत्येकाच्या आयुष्यात घडत गेलेले लहान-मोठे बदल, त्यांची झालेली वेडीवाकडी मानसिक वाढ, हे सारे एकाहून एक लाजवाब स्वरूपात या सहा शहाण्या, गोड कार्ट्यांनी वठवले आहे. विशेषत: स्त्रीत्वाची सूक्ष्म जाण रक्तात उमललेली डायना 'बापा'चे म्हणून चुंबन घेते आणि तिला येतो तो फक्त—फक्त 'पुरुषा'चा गोंधळवणारा, घाबरवणारा, शहारून टाकणारा प्रत्यय; दहा—अकरा वर्षांच्याच त्या पोरीने हा फार फार नैसर्गिकपणे व्यक्त केला आहे. आईच्या आत्म्याशी तिचे चालणारे संवाददेखील तिने खूप तद्रूपतेने, झपाटल्यागत वठवले आहेत. हे सारे केवळ शिकवून येणार नाही. तसे म्हटले तर या सहाही पोरांत उजवेडावे करणे कठीण आहे. ही सहा पोरे सोडल्यास बापाचे काम करणारा डर्क बोगार्डदेखील पोरांइतक्याच समजुतीने आपल्या भूमिकेत वावरला आहे. त्याचा चेहराही या विशिष्ट भूमिकेला अभावितपणे अर्थ देत राहतो. हे सर्व यश जितके नटांचे तितकेच दिग्दर्शकाचेही मानले पाहिजे. दिग्दर्शक क्लेटन यांनी रंगीत छाया-चित्रणाची पत्करली आह ती मंद रंगांची, जुन्या पेंटिंग्जचे स्मरण देणारी शैलीही पात्रयोजनेइतकीच या चित्रपटात आपल्या ताकदीने जाणवते. काही काही दृश्ये आणि दृश्यांपैकी अघले मघले क्षण तर दृश्य सामर्थ्याच्या दृष्टीने अप्रतिम आहेत. चित्रपटाच्या 'मूड'ला रंगीत छायाचित्रण किती साहाय्य करू शकते त्याची परिसीमा या चित्रपटात आढळते. म्हणून आरंभीच म्हटले की चित्रपट फार चांगला, फार समर्थ आहे. पण—

तो फार अस्वस्थ करणारा आहे. विशेषत: चार्ली येऊन पोचेपर्यंतचा त्याचा भाग आपल्यासारख्या भावनावश माणसांच्या काळजाचे पाणी—पाणी करतो. ती शहाण्या मुद्रांची सहा पोरकी भावंडे पाहावत नाहीत. त्यांच्या शब्दाशब्दाला त्रास होतो. नंतर मात्र चार्लीच्या आगमनानंतर ताण पुष्कळ कमी होतो; तो अखेर अखे पुन्हा दाटून येतो. यावरून आठवण होते ती 'प्रभात'च्या 'ज्ञानेश्वर' चित्रपटाची. त्यात आई-वडिलांनी आत्महत्या केल्यानंतर उघड्या, कठोर जगात राहिलेली अशीच चार गोजिरवाणी, शहाणी भावंडे होती. त्यांना पाहताना असेच

आपले डोळे वारंवार भरले होते. ती त्या चित्रपटातच उत्तरार्धात पुढ एकाहून एक मोठ्ठी झाली. या सहा कोवळ्या जीवांचे नंतर काय होते ते मात्र दिग्दर्शकाने तुमच्या–माझ्या कल्पनेवर सोपविले आहे. त्यांना जणू पडद्यावर त्या जगातून आपल्या या रोकडच्या जगात सोडून दिले आहे, आपल्या हवाली केले आहे.

आपण यांचे काय करणार? मख्खपणे त्यांचे जे होईल ते पाहणार? त्यांच्यासारख्या जबाबदाऱ्यांच्या बाबतीत एरवी जसे आपण डोळे सोयिस्करपणे झाकून घेतो, आणि सुखाने जगतो तसे जगणार? की त्यांच्या भविष्याची सक्रिय चिंता वाहणार?

म्हणून म्हटले, हा सुंदर चित्रपट मी पुन्हा पाहणार नाही. उगाच जिवाला ताप! ◻

## अणुचालित उंदीर

इंग्रजी चित्रपटाला मी सहसा उशीरा पोचत नाही. खेळाच्या वेळेआधी पाच-दहामिनिटे मी माझ्या आसनात जाऊन बसतो. प्रथम जाहिरात–पट नावाचे काहीतरी तोडके मोडके, रंगीत संगीत, कशाची तरी बटबटीत जाहिरात करणारे प्रकरण येऊन जाते. बहुधा आपल्याला या आधी आणखी कोणत्या तरी चित्रपटापूर्वी यातले काही भेटलेले असते. एकदाच भेटले असल्यास नशीब समजावे कारण काही वेळा रेडियोवरच्या भावगीतांसारखे वारंवार तेच तेच चरबट जाहिरात पट आपल्याला पुन्हा पुन्हा दिसतात आणि वैताग येतो. ही शत्रूमंडळी समोरच्या पडद्यावर धुडगूस घालीत असता मी डोळे मिटून अंधाराचा आणि एअरकंडिशण्ड थंडाव्याचा आस्वाद घेतो. नंतर आनेवाल्या चित्रपटांच्या ' ट्रेलर ' नामे जरा अधिक गतिमान आणि चुटचुटीत जाहिराती येऊन जातात. यांच्याबाबतीत धोरण तटस्थतेचे. काही बरे आणि वेगळे दिसले तर पाहावे. तेच तेच ' मिलिअन डॉलर स्टपेण्डस ',' पिक्चर ऑफ द सेंच्युरी ', ' ब्रेथटेकिंग ', ' हार्टवॉर्मिंग ', 'नर्व्हशॅटरिंग' असले वापरून वापरून चोथा केलेले शब्द नव्याने ओरडले जाऊ लागले आणि तीच दीर्घ चुंबने, अस्पष्ट प्रेमसंवाद, ठोठो प्रसंग, धांगडधिंग्याचे नाच समोर दिसू लागले तर समोरच्या नाहीतर पलीकडल्या आसनांतल्या युगुलाच्या जराशा रंगू लागलेल्या प्रत्यक्ष प्रेमाचे निरीक्षण जमल्यास तेवढा वेळ पूर्ण तटस्थतेने

करावे. जे चित्रपटात चालते ते चित्रपटगृहात न चालण्याला काहीच कारण नाही. कुठून तरी ठराविक वेळ गेल्याशी कारण. मग कधी कधी पडद्यावर एखादा छोटा व्यंगपट पाहायला मिळतो. याची निश्चिती नसते, पण जेव्हां हा असतो तेव्हा एकेकदा पुढला चित्रपटदेखील मला त्यापुढे फिका वाटतो. मग अध्ये मध्ये येऊन जाणाऱ्या वार्तापटाचे तर विचारूच नका. परवा 'मदर्स हाऊस' पाहण्यासाठी मेट्रो चित्रगृहात जाऊन बसलो आणि टॉम अँड जेरी व्यंगपट–मालेतला नवा कोरा किस्सा पडद्यावर पाहायला मिळाला. हा मलताच अफलातून निघाला कारण नित्य नवनवीन कल्पनांच्या वारूवर बसवून बोकोबा टॉम आणि उंदीरमामा जेरी यांना दोन-तीन मिनिटांत नको नको तिथून पिसाटवेगाने हिंडवून आणणाऱ्या व्यंगपट-निर्मात्यांनी या खेपेस एक चमकदार कल्पना केली होती. ते म्हणाले असतील, माणसांचे उंदीर-मांजराचे खेळ हल्ली अणुशक्तीमुळे एका अचाट आणि अतर्क्य पातळीवरून चालतात; आपण साक्षात उंदीर-मांजराचाच खेळ अणु-शक्तीने प्रभावित करून काय काय होऊ शकते ते दाखवू.

## मार्जारास्त्र × मूषकास्त्र

परिणामी मी पाहिला तो 'अणुचलित उंदीर' हा व्यंगपट निर्माण झाला. बोकोबा आणि उंदीरमामांनी आता प्रत्यक्ष व्यवहार थांबवलेला असतो. उंदीराच्या वासात बोकोबांचे अवकाश – टेहळणी – यंत्र राहाते. बोकोबा आपल्या 'प्रयोगशाळे'त स्वतःच्याच शेपटीवर बसून फक्त खिटया दाबतात. समोरच्या पडद्यावर आसपासच्या शेकडो मैलांच्या परिसरातला उंदीर नेमका येतो, की त्याच्या पारिपत्यासाठी बोकोबांसारखंच दिसणारं 'क्षेपणास्त्र' झुंईक्कन निघालेच. परंतु उंदीर देखील आता तसा गरीब राहिलेला नाही. आत्म संरक्षणाची त्याचीदेखील तयारी कडेकोट आहे. येऊ पाहणाऱ्या मार्जारास्त्राच्या सुगाव्यासाठी त्याची 'यंत्रणा' तयारच असते. मार्जारास्त्र आता मूषकास्त्राचा धूमधाव पाठलाग करते आणि खुद्द मूषकमहाराज याने वेळीच सावध होतात. आता ते बिळाचा आश्रय घेऊन थरथरत लपून राहत नाहीत. अणुशक्तीवर चालणारा आक्रमक पोलादी उंदीर मूषकास्त्रावर पाठवतात. दोन्हीही मंडळी 'रणा'त सारखीच मातबर ठरतात. कोणी कोणाला खाऊ किंवा मारू शकत नाही. अणु–उंदीर एकदम अवकाशस्थ होताच अणु–मांजरदेखील तत्काळ पोलादी जबडा वासून अवकाशापर्यंत उंच होते. पण अणु–उंदिराला गट्ट करणे शक्य नाही. दोन्ही पक्ष तात्पुरते माघार घेतात. उंदराला एक समजते की धोकेबाज शत्रू असा सीमेवर सतत ठेवणे आपल्या विकासाला पोषक नाही. त्याचा शक्य तर खिमाच उडवला पाहिजे. अणुशक्तीवर चालणारा भरभक्कम रणगाडा घेऊन आता तो स्वतः निघतो. थेट बोकोबांच्या गोटात तो चालून जातो. (अणुशक्तीने उंदरालाही केवढे बळ येते पाहा!) बोकोबांकडे या परिस्थितीत उपयुक्त अशा युक्त्या उपलब्धच असतात.

ते अणुचलित प्रचंड लोहचुंबकाने रणगाडाच वर खचून घेतात. उंदीर यावर किंचित्काळ हवालदिल होतो. पण मग तो लगेच प्रसंगावधानाने पॅराशूट उघडून खाली उडी घेतो. आणि लोहचुंबक चालू आणि बंद करणारी खिटी दाबतो. त्यासरशी रणगाडा खाली येतो तो धडाड्दिशी बोकोबांच्या टाळक्यात ! चांगले करंगळीएवढे उंच आणि जाड टेंगूळ येईस्तोवर तो बोकोबांना त्यांच्याच अणुयंत्रणेने हे असे पुन्हा पुन्हा पिटतो. शेवटी बोकोबांचे स्पेअरपार्ट सुटू लागतात तेव्हा कसेबसे करुणा भाकून ते उंदराच्या तावडीतून पळतात. पण यःकश्चित उंदराकडून पराभव कोणत्या स्वाभिमानी बोक्याला सहन होईल बरे ? आता ते महाभयंकर प्रचंड विध्वंसक अण्वस्त्र तयार करून हरामखोर उंदराची वाट पाहतात. उंदीरही एक उस्सेभी ज्यादा महाभयंकर अस्त्र बनवतो. या अस्त्रांचा दोघांच्या भांडणांत होतो स्फोट आणि शेवटी एक हाडूक दोघेही जोडीने वखवखून चघळताना दिसतात. मधून मधून कृतज्ञ बोका उदार उंदराचे चक्क मटामट पापे घेतो. बाकी सर्वत्र विध्वंसच विध्वंस. पण मध्येच बोक्याच्या ध्यानात येते की हे हाडूक चघळून काय कपाळ पोट भरणार ? त्यासरशी तो एकदम्म उंदराची पाठ धरतो; आणि अणुशक्तीसकट जगाला आचवलेले हे दोन पोटार्थी प्राणी—उंदीर पुढे, बोका मागे—पुरातन काळापासून चालत आलेल्या निसर्गनियमाप्रमाणे, आपल्याच पायांनी जीव खाऊन धावत भिरकांडत, उड्या घेत क्षितिजापल्याड निघून जातात. पाटी येते : दि एण्ड ? ? ? म्हणजे हा तरी शेवट म्हणायचा का ? कदाचित् पुन्हा सर्व चक्रानेमिक्रमाने घडले तसेच घडू लागेल ! काय हो ?

अशा या हलक्या फुलक्या, मजेशीर व्यंगपटांमध्ये उगीच बोध शोधीत बसू नये. पोटभर हसावे आणि सोडून द्यावे. निखळ आणि भरपूर हसण्यासारखे हल्ली फार कमी भेटते; त्याला उगीच बोधाची अपेक्षा लादून गढूळ बनवू नये. बोध घ्यायचाच तर हा की, रेखा, रंग आणि कॅमेरा, यांच्या साहाय्याने असा गोजिरवाणा पण लढाऊ उंदीर आणि उग्र तरीही केविलवाणा बोका ' सजीव ' करणे ही किमया भलतीच अवघड असली पाहिजे.... O



# भारत, पाकिस्तान आणि चीन

## आजवरची आर्थिक वाढ आणि भावी वाटचाल

### पूर्वार्ध

लेखक : के. एन्. राज
प्राध्यापक
दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स

भारत आणि पाकिस्तान ही स्वतंत्र राष्ट्रे जन्माला यऊन व चीनही प्रदीर्घ संघर्षानंतर शांत होऊन तेथे सामर्थ्यवान सरकार स्थापन झाल्यास आता सुमारे वीस वर्षे होत आली. राजकीय सत्तांतरानंतर आलेल्या लोकप्रिय सरकारच्या राजवटीत राष्ट्रात स्थैर्य आणि शांतता निर्माण होईल आणि झपाट्याने आर्थिक प्रगती होऊन शतकानुशतके लोकांच्या हाडीमाशी खिळलेले दारिद्र्य आणि बेकारी लौकर नष्ट होईल अशी सर्वसाधारण अपेक्षा होती. स्वातंत्र्योत्तर काळात या दिशेने काहीच प्रगती झाली नाही असे म्हणणे चुकीचे व अन्यायकारक होईल. परंतु आजवरची कामगिरी अपेक्षेच्या मानाने तोटकी आहे हे निश्चितच. यापेक्षाही चिंता करण्याची गोष्ट ही की, या तीनही देशांचे आपल्यासमोरील वरील पायाभूत कार्यापासून चित्त ढळले असून त्यांची शक्ती आणि संपत्ती अलीकडे वेगळ्याच प्रश्नांना तोंड देण्यात वापरली जात आहे.

सिद्धांतप्रणालीतील विरोध, राष्ट्रीय हितसंबंधांतील संघर्ष, अंतर्गत दुफळी आणि परकीय हस्तक्षेप या व अशा प्रकारच्या अनेक गोष्टी या परिस्थितीला कारणीभूत आहेत. आणि म्हणून सद्य:परिस्थितीत आकस्मिक फेरफार घडून येईल अशी आशा करणे अवास्तव ठरेल.

**पाकिस्तानला रशियाकडून मिळालेल्या लष्करी मदतीबद्दल आपल्याला तीव्र चिंता वाटू लागली आहे. वास्तविक तीव्र चिंता कशाची वाटायला हवी !**

यासाठी हा प्रदीर्घ व अभ्यासपूर्ण लेख 'माणूस' मध्ये दोन भागांत देण्याचे योजले आहे. हा लेख प्रा. राज यांनी लालबहादूर शास्त्रीजी यांच्या स्मरणार्थ दिलेल्या दोन व्याख्यानांच्या आधारे तयार करण्यात आला आहे.

तरीही, गेल्या दहा–पंधरा वर्षांतले भारत, पाकिस्तान व चीन या देशांचे आर्थिक क्षेत्रातील अनुभव अभ्यासून त्यांतून काय निष्कर्ष निघतात ते पाहणे उपयुक्त ठरेल, असे वाटते. **राष्ट्राची धोरणे अंतर्गत आर्थिक दडपणांतून बऱ्याच प्रमाणात आकार घेत असतात.** त्यामुळे या अभ्यासाने आपल्याला या तीन देशांच्या हित-संबंधांतील सारखेपणा कळून येईल. शिवाय आर्थिक क्षेत्रातील विविध प्रवाहांच्या पृथक्करणातून त्यांच्या भावी धोरणांचा आणि घडामोडींचा अंदाज घेता येईल, आणि म्हणून या व्याख्यानमालेत मी गेल्या पंधरा वर्षांतील या तीन देशांच्या आर्थिक वाढीच्या प्रमुख वैशिष्ट्यांचे समालोचन करून त्यात भविष्याविषयी काय सूचना आढळते त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

भारताविषयी संक्षेपाने विवेचन करीन कारण आपल्यापैकी बहुतेकजण या काळातील भारतातील घडामोडींशी परिचित आहेत. या घडामोडींचा उल्लेख मी फक्त इतर देशांतील घडामोडींशी तुलना करताना आणि त्यांचे आपल्या दृष्टीने असलेले महत्त्व विशद करण्यासाठी करणार आहे. पाकिस्तान आणि चीन या देशां-विषयी आपल्याला फारच थोडी माहिती आहे. या देशांचा मी जास्त विस्तारपूर्वक परामर्श घेणार आहे. **ह्या पहिल्या व्याख्यानात आपण पाकिस्तानचा विचार करू.**

राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचे मूल्यमापन त्याच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीच्या दरावरून करण्याची साधारण रीत आहे. ही कसोटी तशी अपुरी आहे, कारण वाढीच्या इतर काही बाजूंचा त्यामध्ये परामर्श घेतला जात नाही. तरीसुद्धा, राष्ट्रीय उत्पन्नातील वाटचाल पाहणे सुरुवात म्हणून उपयुक्त ठरेल. याकरिता प्रथम गेल्या पंधरा वर्षांत पाकिस्तानच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा दर काय राहिला त्याचा थोडक्यात निर्देश करून त्याची भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीच्या दराशी मी तुलना करणार आहे.

अलीकडील दुरुस्त सरकारी अंदाजाप्रमाणे पाकिस्तानचे राष्ट्रीय उत्पन्न (स्थिर किंमतीत) १९५०–५१ ते १९६४–६५ या काळात ६१ टक्क्यांनी वाढले. यावरून असे दिसते की दरशेकडा ३·४५ या चक्रवाढ दराने वाढ झाली. याच काळातील भारतातील राष्ट्रीय उत्पन्नाचे आकडे दरवर्षी दरशेकडा ३·८७ चक्रवाढ दराने वाढ दाखवितात. १९६५–६६ या सालातले भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे आकडे अजून उपलब्ध नाहीत. परंतु हे वर्ष जर हिशेबात धरले, तर गेल्या पंधरा वर्षांच्या काल-खंडातील भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा दर पाकिस्तानपेक्षा काहीसा कमी भरेल अशी शक्यता आहे.

अशा प्रकारे पंधरा वर्षांचा एक सलग कालखंड धरून तुलना करण्यास राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीच्या दरातील काही महत्त्वाचे फरक लक्षात येत नाहीत अशी एक भूमिका आहे. अधिक काटेकोरपणे सांगायचे तर, या मंडळींचे म्हणणे असे की, पाकिस्तानपुरते या पंधरा वर्षांचे स्पष्टपणे दोन कालखंड पडतात. पहिला १९५९–६० च्या अगोदरचा आणि दुसरा १९५९–६० च्या नंतरचा. दुसऱ्या काल-खंडात पाकिस्तानच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीच्या वेगात वाढ दिसून येते, तर भारतात या कालखंडात वाढीचा वेग कमी झाल्याचे दिसते.

१९५८ च्या ऑक्टोबरमध्ये पाकिस्तानमध्ये नवीन लष्करी राजवट सुरू झाली आणि त्या राजवटीखाली १९६० साली पाकिस्तान सरकारने दुसरी पंचवार्षिक योजना हाती घेतली हे, बहुधा, १९५९–६० वर्ष नवे वळण देणारे वर्ष मानण्याचे कारण असावे. अभ्यासासाठी पायाभूत वर्ष निवडण्यासाठी हे कारण पुरेसे असले तरी, पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेची या नंतरच्या काळातील वाढ मोजताना त्या आधीच्या कालखंडातील घडामोडी लक्षात न घेता स्वतंत्रपणे विचार केल्यास दिशा-भूल होईल. कशी ते पुढे स्पष्ट होणारच आहे. परंतु, तात्पुरती म्हणून ही विभागणी आपण मान्य करायची ठरवली तर, या दोन कालखंडांत राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीच्या दरांत आपल्याला लक्षात येण्याजोगा फरक दिसतो यात शंका नाही. पहिल्या, १९५०–५१ ते १९५९–६० या काळात पाकिस्तानच्या राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ दरसाल २½ टक्क्यांपेक्षा कमी दराने झालेली दिसते, तर १९५९–६० नंतरच्या दुसऱ्या कालखंडात ही वाढ दरसाल ५½ टक्क्यांपेक्षा जास्त दराने झालेली दिसते.

याच प्रकारे भारतातील कालावधीचे दोन खंड धरून—म्हणजे १९५९–६० च्या आधीचा आणि नंतरचा—आर्थिक घडामोडींचा आढावा घेतला तर तेथेही दुसऱ्या कालखंडात अशाच प्रकारे वाढीचा वेग अधिक झाल्याचे आढळून येते. पहिल्या कालखंडात भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ दरसाल ३$\frac{3}{4}$ टक्के चक्रवाढ दराने झालेली दिसते, तर दुसऱ्या कालखंडात ही वाढ दरसाल ५ टक्के दराने झालेली आढळते. या दुसऱ्या कालखंडात १९६५–६६ हे वर्ष समाविष्ट केल्यास वाढीचा दर अर्थातच खाली येतो. परंतु, अतीव दुष्काळाचे वर्ष कालखंडाचे शेवटचे वर्ष म्हणून समाविष्ट करण्यावर वाढीच्या दराविषयीचे जे प्रमेय निर्णायकरीत्या अवलंबून आहे त्या प्रमेयाची प्रामाण्यता फारच वादग्रस्त म्हणायला हवी. किंबहुना, अशा प्रकारे, कमीअधिक प्रमाणात, लहरीनुसार कोणतेतरी एक वर्ष पायाभूत धरून काही थोडच्या काळाविषयी सामान्य सिद्धांत निष्पन्न करणे धोक्याचे असते हीच गोष्ट यावरून कळून येते. म्हणून, भारत आणि पाकिस्तान यांच्या विकासाच्या भिन्न वळणांची चिकित्सा करण्याऐवजी, पाकिस्तानच्या राष्ट्रीय उत्पन्नात पूर्वीच्या कालखंडाशी तुलना करता १९५९–६० नंतर अधिक वेगाने वाढ का झाली त्याची कारणे पाहणे अधिक अर्थपूर्ण ठरेल. या दरवाढीचे स्पष्टीकरण महत्त्वाचे आहे. त्यावरच गेल्या काही वर्षांतील पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे मूल्यमापन आपण काय करतो आणि भविष्यकाळाच्या दृष्टीने त्याचे महत्त्व आपण काय मानतो या गोष्टी अवलंबून आहेत.

पाकिस्तानच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीची बारकाईने पाहणी केल्यास १९५९–६० नंतर मुख्यत: शेती आणि सेवाकार्ये (Services) या दोन विभागांत वाढीच्या उच्च दरांची नोंद आढळते. पहिल्या कालखंडात शेती उत्पन्नवाढीचा दर




वर्षाला १$\frac{1}{2}$ टक्के इतका होता, तर दुसऱ्या कालखंडात तो वर्षाकाठी सुमारे ३ टक्के दिसतो. सेवाकार्य विभागातही उत्पन्नवाढीचा दर अशाच प्रकारे जलद गतीने वाढलेला दिसतो. पहिल्या कालखंडात वाढीचा दर वर्षाला ३ टक्क्यांहून कमी होता. तर दुसऱ्या कालखंडात तो प्रतिवर्षी ६ टक्क्यांवर गेला. १९५९–६० ते १९६४–६५ या काळातील राष्ट्रीय उत्पन्नवाढीत जवळजवळ ७० टक्के वाटा या दोन विभागांचा होता.

आणखी एका विभागात, बांधकामात, अशाच प्रकारचा वाढीचा उच्चतर दर दिसून येतो. १९५९–६० नंतरच्या पाच वर्षांत बांधकाम या विभागाचे उत्पन्न जवळजवळ चौपट वाढले. (अर्थव्यवस्थेतील भांडवली गुंतवणकीच्या परिमाणात झपाट्याने होत असलेल्या वाढीचेच हे स्पष्ट प्रतिबिंब दिसून येते.) १९६५–६६ सालात बांधकाम विभागातून होणारे उत्पन्न कारखानदारी उद्योगधंद्यांतून निर्माण होणाऱ्या उत्पन्नाच्या $\frac{1}{3}$ पटीपेक्षा जास्त आणि एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५ टक्क्यांपेक्षा जास्त होते असे दिसते.

या दोन कालखंडांतील मोठ्या कारखानदारी उद्योगधंद्याच्या वाढीची तुलना करता असे दिसते की दुसऱ्या कालखंडात उत्पादनवाढीचा दर पहिल्या कालखंडातील वाढीच्या सरासरी दरापेक्षा थोडा खाली आला आहे. परंतु, पहिल्या कालखंडात आपल्याला वाढीचा दर अधिक दिसण्याचे मुख्य कारण, पाकिस्तानात सुरुवातीला कारखानदारी उद्योगधंद्यांचा विभाग एकूण अगदी लहान होता, हे आहे. तेव्हा, दुसऱ्या कालखंडात वाढीचा वेग मंदावलेला दिसतो. त्यात फार खोल अर्थ पाहणे योग्य ठरणार नाही. महत्त्वाची गोष्ट ही की, १९५९–६० नंतर कारखानदारी उद्योगधंद्याच्या उत्पादनवाढीचा दर प्रतिवर्षी १३$\frac{1}{2}$ टक्क्यांच्या वर राहिल आहे. वाढीचा दर कमी झाला असला तरी, दुसऱ्या कालखंडात एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील त्याचा हिस्सा वाढला आहे आणि त्यामुळे वाढीचा दर कमी होण्याचा अनिष्ट परिणाम होणार नाही.

या कालावधीतील राष्ट्रीय उत्पन्नाची विभागशः पाहणी केल्याने आपल्या हाती या काही गोष्टी लागतात. या माहितीमध्ये प्रतिबिंबित झालेल्या वाढीचे मूल्यमापन कसे करावयाचे आणि दुसऱ्या कालखंडात आपल्याला जी सर्वांगीण वेगवान वाढ दिसून येते, तिची कार्यकारणमीमांसा कशी करावयाची हा आता प्रश्न आहे. या प्रवेगाला कोणते घटक कारणीभूत झाले, हे पाहणे अगत्याचे आहे.

आर्थिक विकासाच्या या अवस्थेत असलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये सेवाकार्य विभागातून मिळणाऱ्या उत्पन्नात झालेली वाढ ही अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता वाढल्याची निदर्शक मानू नये आणि आर्थिक वाढीची कारणे शोधताना वस्तु–उत्पादनावर लक्ष केंद्रित करावे या बाबतीत सर्वांचे एकमत होईल. शेती आणि उद्योगधंदे या विभागात जी वाढ नोंदविली गेली आहे तिचेच मूल्यमापन प्रामुख्याने करणे आव-

श्यक आहे असा याचा अर्थ आहे.

असे एक मत मांडले जाते की, या कालखंडातील पाकिस्तानच्या आर्थिक वाढीच्या उच्च दराचे मुख्य कारण पाकिस्तानने शेती उत्पादनात मारलेली मुसंडी हे होय. तसेच, पुढे जाऊन असे मत मांडले जाते की, शेतीतली मुसंडी आणि उद्योगधंद्यांच्या उत्पादनवाढीचा उच्च दर, या एकाच वेळी साधलेल्या दोन गोष्टी १९६० च्या सुमारास पाकिस्तानातील नवीन शासनाने धोरणात जे बदल केले त्यामुळे शक्य झाल्या.

हे मत १९६५ सालच्या उन्हाळ्यात हार्वर्ड विश्वविद्यालयात भरलेल्या एका परिषदेत प्रथम मांडले गेले आणि तेव्हापासून त्याला बरीच सार्वत्रिक मान्यता मिळाली आहे. त्यामुळे या मताचा सखोल परामर्श घेणे जरूर आहे. परंतु तत्पूर्वी अर्थव्यवस्थेच्या सुधारलेल्या कामगिरीला कारणीभूत मानले जातात ते पाकिस्तानी धोरणातले बदल कोणते हे जाणून घेणे उपयुक्त ठरेल. सुदैवाने, या परिषदेला हजर असलेल्या सुविख्यात आर्थिक पत्रपंडित बार्बारा वॉर्ड यांनी ते बदल सारांशाने ग्रंथित केलेले उपलब्ध आहेत.

"आयुब शासनाने दोन महत्त्वाचे निर्णय घेतले. एका निर्णयाने योजनाबद्ध अर्थव्यवस्थेच्या चौकटीत खासगी उद्योगधंदे आणि खुला व्यापार यांवर बुद्धिपुरस्सर अवलंबून राहण्याचा निर्णय घेतला. शेती विभागाला नावडतीची वागणूक द्यावयाची नाही असा दुसरा निर्णय घेतला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात पायाभूत सामाजिक–आर्थिक सोयी व व्यवस्था निर्माण करण्यासाठीच मुख्यत: सरकारी भांडवल गुंतविले आणि खाजगी संघटक–प्रवर्तक पुढे येत नव्हते अशा ठिकाणीच फक्त, उदाहरणार्थ पूर्व पाकिस्तानात, सरकारी क्षेत्रात प्रत्यक्ष वस्तु–उत्पादनाचे कार्य हाती घेतले. परदेशी हुंडणावळीवरील प्रत्यक्ष स्वरूपाचे निर्बंध हळूहळू कमी केले आणि देशातील औद्योगिक विकासाला वाव देण्याच्या दृष्टीने परदेशी किंवा खाजगी भांडवल गुंतवणुकीला उत्तेजन देणारी करपद्धती व बोनस-योजना आखली. शेतीच्या क्षेत्रात बाजारभावांपेक्षा कमी किंमतीने धान्यवसुली करणे, विभागबंदी आणि शिधा–वाटप हे कार्यक्रम रद्द करण्यात आले. शेतीकरिता लागणारी खते, नलिकाकूप, यासारख्या गोष्टींकरिता परकीय चलन सढळपणे देण्यात आले. एकूण गुंतवणुकीमधील शेतीतील गुंतवणुकीचा हिस्सा ५ टक्क्यांवरून १६ टक्क्यांवर नेण्यात आला."

**पाकिस्तानने शेतीत उत्पादनवाढीचा उच्च दर गाठला असल्याने पाकिस्तानचा समावेश "शेतीमध्ये गतिमानता आणू शकलेल्या अगदी मोजक्या विकसनशील राष्ट्रांमध्ये" होतो असा हार्वर्ड गटाचा दावा आहे.**

या वाढीला जे धोरण कारणीभूत झाल्याचे मानण्यात येते त्याच्या गुणदोषांची

[पृष्ठ ४९ वर

# आस्वाद :

" तैं नर क्या पुरान सुन कीना ।।
पारनि भक्ति नहि उपजी ।
भूखैं दानु न दीना ।। १ ।।
करमु न बिसरिउ क्रोधु न बिसरिऊ ।
लोभ न छूटिउ देवा ।।
परनिंदा मुखते नहि छूटि ।
निफल भयी सभ सेवा ।। २ ।।
वाट पारि घरु मूसि बिरानै ।
पेटु भरै अपराधी ।।
जिहि परलोक जाइ अपकीरति ।
सोइ अविद्या साधी ।। ३ ।।
हिंसा तउ मनते नहि छूटि ।
जीवदया नहि पाली ।।
परमानंद साधसंगत मिली ।
कथा पुनीतन चाली ।। ४ ।। "

महाराष्ट्रातील जोगा परमानंद या संताचे, शीखांच्या ग्रंथसाहेबात समाविष्ट झालेले हे पद्य आहे. भक्तिमय अंतःकरणाच्या सदाचरणाचा निर्मळ उपदेश येथे परमानंदांनी केला आहे.

" नर हो ! तुम्ही पुराण श्रवण करून काय केले ?" असा रोकडा सवाल त्यांनी प्रारंभीच लोकांना टाकला आहे. " जर मनात शुद्ध भक्ती उत्पन्न झाली नाही; एखाद्या भुकेलेल्या अथवा गरीब माणसाला काही दान करण्याची सद्बुद्धी झाली नाही तर या पुराणश्रवणाचा काय उपयोग आहे ?" असे त्याचे स्पष्टीकरण ते करतात. पुराण हे केवळ वेळ घालवण्याचे साधन नाही. केवळ देवाचे चार शब्द कानावर पडले म्हणजे चित्रगुप्ताच्या खात्यावर पुण्य जमा होत नाही. त्या पुराण-श्रवणाने खरोखर अंतःकरणाची तार छेडली गेली पाहिजे. त्यातून भक्तीचे संगीत निर्माण झाले पाहिजे. सर्वांविषयी अथांग दया नि सहानुभूती मनात काठोकाठ भरून आली पाहिजे. आणि मुख्य म्हणजे याचे आचारात प्रतिबिंब पडले पाहिजे. भोवतालच्या सामान्य जनांचे दुःख जाणवून त्यासाठी मदतीचा हात पुढे झाला पाहिजे. हे जर होत नसेल तर पुराण ऐकूनही काहीच उपयोग झाला नाही असे

म्हणावे लागेल. देवळाच्या चार भिंतींत गुदमरणाऱ्या पुराणकीर्तनांची ही व्यावहारिक नि प्रायोगिक बाजू खरोखर महत्त्वाची आहे.

देवाच्या जडरूपाची कितीही सेवा केली तरी अंतर्बाह्य शुद्धीकरण झाल्याशिवाय त्या सेवेला काहीही अर्थ नाही. परमानंद म्हणतात, " काम सोडला नाही; क्रोध विसरला नाही; लोभ सुटला नाही; दुसऱ्याची निंदा करण्याची तोंडची सवय सुटली नाही — मग सेवा व्यर्थ झाली, निष्फळ झाली !" देवमूर्तीची अथवा प्रेषिताची सेवा करण्यापेक्षा आत्मारामाची सेवा प्रथम केली पाहिजे. त्याला निर्मळ केले पाहिजे. त्याच्यावरील षड्विकारांचे मलिन थर धुवून काढले पाहिजेत. एरवी जडरूपाची सेवा आपली फक्त कर्मेंद्रिय करतील. मन कामक्रोधांनी बरबटलेले राहील. अर्थातच ती सेवा सफल होणार नाही. किंबहुना ती खरी सेवाच होणार नाही. मनामध्ये काम–क्रोध–निंदा–लोभ यांना स्थान देऊन वरवर केलेले ते सेवेचे सोंग होईल.

एक फार सुंदर दृष्टांत परमानंदांनी दिला आहे. ते म्हणतात, " उंदीर हा ठिकठिकाणी वाटा पाडतो, बिळे करतो. पोट भरण्यासाठी त्याला हा अपराध करावा लागतो. अविद्येच्या, भौतिक सुखाच्या मागे लागलेले लोक असेच असतात. परलोकापर्यंत त्यांची दुष्कीर्ती जाते." क्षुद्र भौतिक सुखाच्या मागे लागणाऱ्या हतभाग्यांचा क्षुद्रपणा येथे चांगला बिंबित झाला आहे. उंदराचे पोट भरणे ही जितकी क्षुद्र गोष्ट, तितकेच या येरूंचे क्षुद्र समाधान. पण उंदराप्रमाणेच यांची दुष्कीर्तीही पसरली जाते. परलोकापर्यंत. विश्वमंदिराची नासधूस हे दुर्भागी करतात. आपल्या करणीने त्यात बिळे पाडतात.

अहिंसा आणि जीवदया या थोर तत्त्वांचा निर्देशही परमानंदांनी जाता जाता केला आहे. " हिंसा तउ मनते नहि छूटि। जीवदया नहि पाली " ही सामान्यांची शोकस्थिती असते. मन सात्त्विकतेने, सोज्वळतेने परिपूर्ण भरलेले नसल्यामुळे मनातून हिंसेचे मूळ जाता जात नाही. जीवमात्राशी समपातळीवर सहानुभव साधलेला नसल्यामुळे जीवांविषयी दया उपजत नाही. साधुसंतांच्या संगतीनेच मनाचे अशा तऱ्हेचे उन्नयन होऊ शकते हे परमानंदांनी स्वानुभवाने सांगितले आहे. " परमानंद साधसंगत मिली। कथा पुनीतन चाली ।। "

जोगा परमानंद हे जातीने तेली. बार्शीचे राहणारे. सामान्यातल्या सामान्य परिस्थितीत निर्माण झालेल्या या असामान्य माणसाची भक्तिसाधना इतकी थोर होती की पंजाबातील शीखांच्या धर्मग्रंथात त्यांचे पद्य समाविष्ट झाले ! भाषेची प्रासादिकता आणि रसाळपणा, समजावून सांगण्याची हातोटी आणि सामान्यांच्या समजुतींशी साधलेला सुसंवाद हे त्यांचे गुण या छोट्याशा पद्यातही दिसून येतात. तत्त्वज्ञान आणि व्यवहार, विचार आणि आचार यांची सांगड घालणारा त्यांचा हा उपदेश उल्लेखनीय आहे. ○

रसिक



# अखेर रक्त सांपडलं !

बाबासाहेब सकटे

हल्ली एक वेडपट मला सतत दृष्टी पडू लागला होता. तो नेहमीच माझ्या पाळतीवर असल्यासारखा वाटतो. पिंजलेल्या पांढऱ्या शुभ्र कापसाप्रमाणे दाढी आणि डोकीचे केस. डोळे निस्तेज आणि आत ओढवलेले गालाची हाडं वर आलेली. कुणाशी काही न बोलणारा न मागणारा असा तो विचित्र म्हातारा सतत माझा पाठपुरावा करीत होता.

मी घरातून बाहेर पडलो की, मला शाळेकडं गावातील मुख्य चौकातून जावं लागतं. चौकात पोहोचताच तो वेडा आभाळाकडं एकटक पाहत बसलेला मला

दिसतो. चौकातून मी पुढं गेलो की, तो आपल्या जागेवरून उठतो आणि माझ्या पाठोपाठ चालू लागतो. शाळेचा पार जवळ आला की, पाराला वळसा घालून मी शाळेच्या पायऱ्या चढू लागतो. आणि तो वेडपट म्हातारा पाराच्या कठड्याचा आधार घेऊन एका पायावर शरीराचा सर्व भार देऊन उभा राहतो. मध्यंतरी केव्हा केव्हा थुंकण्याच्या निमित्तानं बाहेर येऊन पाहतो, त्या वेळी त्याची नजर शाळे-कडंच आहे असं मला दिसून येतं. माझ्या मनात येतं, हा माझा का पिच्छा धरतोय? हे कधी थांबणार? की, हे थांबणारच नाही! माझ्या किंवा त्याच्या अंतापर्यंत हे असंच चालू राहणार की काय? काही सुचत नाही मला अशा वेळी! जवळ जवळ एक वर्षाचा काळ लोटला होता. एक वर्षभर तो माझ्याशी असा विचित्रपणे वागत होता. तोही मला काही विचारीत नव्हता आणि मीही विचारीत नव्हतो.

कित्येक वेळा मी त्याच्या खाण्यापिण्याविषयी चौकशी केली होती. तो असा का फिरतोय? याबाबत काही लोकांकडं चौकशी केली होती. पण मला काहीच माहिती मिळत नव्हती. आणि त्याच्या अशा वागण्याचा मला अर्थबोधही होत नव्हता. तो असा का वागतोय हे विचारण्याचं मला धाडस होत नव्हतं. कारण तो कुणाशी बोलताना किंवा काही मागताना मी कधीच पाहिलं नव्हतं. त्यामुळं त्याच्याबद्दलची माहिती कशी विचारावी, हे न समजल्यामुळं ते एक माझ्या हृदयावर दडपण पडलं होतं. त्याची जोपर्यंत माहिती मिळणार नव्हती, तोपर्यंत ते नाहीसं होणार नव्हतं.

लोकांनी अनेक वेळा त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला होता. पण बोलायला सुरुवात करता क्षणीच तो हातवारे करीत हसत सुटतो, हे मी माझ्या नजरेनं टिपून घेतलं होतं. त्याचं मौन सुटत नव्हतं. त्यामुळं माझ्या मनाला वेदना होत होत्या.

असा हा त्याचा मौनाचा लपंडाव चालू असतानाच माझ्या विरोधकांनी माझ्या-वर जाळं पसरलं. मला त्यांनी कात्रीत पकडलं होतं. ती एक माझ्या मनाला चिंता लागली होती. माझ्या चेहऱ्याला चिंतेनं ग्रासलं होतं. हे त्या वेडपटाला समजलं होतं की काय कोण जाणे! कारण त्यानंतर त्यानं माझा जास्तच मार्ग रोखण्याचा प्रयत्न चालविला होता.

माझ्यावर विरोधकांनी संकटं आणली होती. तरी माझ्या मनात त्या वेड्याला बोलता येतं की नाही हाच विचार पिंगा घालीत होता. त्यामुळं आज विचार करून मी इस्त्रीच्या कपड्याची पर्वा न करता पायावर पाय टाकून शाळेसमोरील पारावर बसलो होतो. मी त्या ठिकाणी बसताच एक वेळ त्यानं माझ्याकडं पाहिलं आणि बाजूला तोंड करून उभा राहिला. सूर्याचा रथ आता थकला होता. कुठपर्यंत बिचाऱ्या सारथ्यानं रथ हाकायचा? सूर्यदेवाचा रथ निघून जाताच सगळीकडं मिट्ट काळोखाचं साम्राज्य पसरलं.

माझ्या मनात एक भीती उद्‌भवली. 'अशा काळोख्या रात्री कुणी आला आणि काठीचे दोन तडाखे लगावून पसार झाला तर? संभव होता. माझ्या वाईटावर

बरेच लोक होते. माझं थोडं घसरलेलं पाऊल आणखी एकदा त्यांना पाहायचं होतं आणि नंतर माझ्यावर हल्ला करायचा होता. माझ्या चारित्र्यावर शितोडे उडवायचे होते. माझ्या वडिलांच्यावरचा सूड ते माझ्यावर उगवू पहात होते. माझ्या वाडवडिलांची मिळकत, जमीन ते हस्तगत करू पहात होते. कारण ती त्यांची होती म्हणे. त्यांच्याकडून माझ्या वडिलांनी हिरावून घेतलीय म्हणे ! त्यानंतर जमीन माझ्याकडून गेली होती व्यसनामुळं ! जमीन माझ्याकडं नव्हती. पण माझ्या-बद्दल लोकांच्या मनात सूडाची ज्योत मात्र तेवत होती.' माझे विचार कुठल्या कुठे वाहवत गेले होते. त्यामुळं विचारांना बांध घालून पायाला कड आल्यामुळं पाय बदलून बसलो. पाय बदलल्यामुळं नकळतच माझ्या तोंडून 'आऽऽई !' एवढाच शब्द बाहेर पडला. माझ्या त्या शब्दानं त्यानं शरीराची हालचाल केली. तोंडाची चाळवाचाळव केल्याचा मला भास झाला. म्हणून मी त्याच्याकडं पाहिलं. अंधारा-तही त्याच्या चेहऱ्यावरचे भाव मी जाणले. त्याला काहीतरी सांगायचं होतं, विचारा-यचं होतं, हे मी ताडलं आणि त्याला मुद्दाम विचारलं,

"कुठले आपण ?"

माझ्या या प्रश्नानं त्यानं थोडसं बावरल्यासारखं केलं. पण क्षणभरच ! लगेच तो मोठ्यानं हंसू लागला. त्याचं हसणं विलक्षण होतं, विचित्र होतं, की माझ्या अंगावर भीतीनं काटा उभा राहिला. त्याचं हसणं थांबल्यावर एकाएकी जोर आल्याप्रमाणं तो म्हणाला,

"मी कुठला ? हे जाणून काय करायचं आहे तुम्हाला ?"

उलट त्यानंच मला प्रश्न केला. तेव्हा काय बोलावं ते मला समजेना. त्याच्या प्रश्नानं मी भांबावून गेलो. मनात विचारचक्र सुरू झालं. 'याला मी प्रश्न विचा-रला तो कोणत्या उद्देशानं विचारला ?, या प्रश्नाचं उत्तरही लगेच मला मिळालं. 'त्याला बोलता येतं की नाही हे मला पाहायचं होतं.' त्यानं ज्या अर्थी मला प्रश्न विचारला त्या अर्थी माझा उद्देशही साध्य होणारच असं मला वाटलं. माझा अंदाज खरा ठरला होता. त्या समाधानातच मी म्हणालो,

"तसं काही नाही. सहज विचारायचं म्हणून विचारलं. काय नाव आपल्या गावाचं ?"

"माझ्या गावाचं नाव ? काय सांगू गावाचं नाव ? होऽऽऽ आता आलं लक्षात ! ज्या गावात जाऊन वस्ती करावी तो माझा गाव ! त्या गावाचं जे नाव तेच माझ्याही गावाचं नाव !" त्याच्या या उत्तरावरून तो हलक्या प्रतीचा माणूस नाही, हे मी जाणलं आणि पुढं म्हणालो.

"घरी कुणी माणसं ?"

"पुष्कळ आहेत. जी मला भीक म्हणून अगर दानधर्म म्हणून खाऊपिऊ घाल-तात, ती माझीच माणसं !"

त्याच्या या उत्तरानं मला दुसरा धक्का बसला. पुढचा प्रश्न काय विचारावा? आणि त्याच्याकडून मला काय उत्तर मिळेल? त्याला बोलता येत असून तो असा कोडयांत का बोलतोय? खात्रीनं याच्या अशा या बोलण्यापाठीमागं काही तरी गूढ असावं असं वाटून माझं डोकं भणभणू लागलं. खाऊ-पिऊ घालणाऱ्या प्रत्येक गावोगावच्या लोकांना सर्वजण आपलीच आहेत असं समजणारी ती व्यक्ती वेडी तर नव्हतीच पण सामान्यही नव्हती. भीक मागून खातोय. दाढीचे व डोकीचे वेण्या घालण्याइतके केस वाढलेत म्हणूनच लोकांनी त्याला वेडा ठरविला होता. पण त्याचे विचार जाणून घेण्याचा कुणीही प्रयत्न केला नव्हता. ते तरी बिचारे काय करतील? बोलताना कधी याला पाहिलाच नव्हता लोकांनी!

"तुम्ही आजपर्यंत बोलत का नव्हता?"

"मी बोलत का नव्हतो? लोकांनी मला वेडा ठरविलं. त्यांची मला किळस आली. शहाण्याला वेडा ठरविणारे हे लोक. मला त्यांच्याशी बोलण्याची घृणा वाटत होती. न्याय नीती या जगात अजिबात उरली नाही. तू मास्तर आहेस! होय ना?"

मी मान डोलवली.

"मग तू तरी न्यायानं, नीतीनं वागतोस? तुझ्या वडिलांनी गोरगरिबांना छळलं. त्यांच्या जमिनी घशात घातल्या. आणि त्यांच्याप्रमाणंच तूही करतोस! थोडा विचार कर! गोरगरिबांचा दुवा घे. त्यांना छळू नकोस. पाठीमागं कीर्ती उरेल असं वर्तन ठेव. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीत मरायचं आणि त्याचा फायदा तुम्ही लोकांनी घ्यायचा? सोडून दे असले घातकी विचार! असं मी नेहमी लोकांना ओरडून सांगत होतो. त्या वेळी लोकांना माझे विचार पटले नाहीत. त्यांनी माझी टिंगल केली. माझ्याकडं पाहून फिदीफिदी हसले. त्याच वेळेपासून मौन पाळलं मी!" असं म्हणून तो स्तब्ध राहिला.

त्याच्या या उपदेशाचा मला मनस्वी राग आला होता. 'रस्त्यावर अन्नान्न, पाणी पाणी म्हणत फिरणाऱ्या एका भणंग भिकाऱ्यानं मला उपदेशाचे डोस पाजावेत? मी म्हणे न्याय नीती सोडलीय! कुणी सांगितल्या तुला या चांभारचौकशा? कुणी सांगितला लहान तोंडी मोठा घास घ्यायला? त्याच वेळी माझ्या डोक्यात अगदी लख्ख प्रकाश पडला. माझ्याबद्दलच्या या न्यायनीतीच्या अफवा कुणी पसरल्या? तर त्या रावजीनं!'

रावजी हा एक आमच्या गावातील कुळवाडी होता. वयानं पन्नाशीला पोहोचला होता. पण अंगातील जोम कायम होता. वयानं आणि पिकलेल्या केसामुळं चेहऱ्याला करडेपणा आला होता. आणि त्या करड्या शिस्तीत वाढलेली त्याची एकुलती एक मुलगी रंभा! खरोखरच ती रंभा. चालू लागली म्हणजे तिच्या चालण्याकडं पाहत राहावंसं वाटायचं. नऊ वारी लुगड्याची चापून चोपून कास घातल्यामुळं नितंबाचा

फुगीरपणा पाहणाऱ्याच्या विशेष नजरेत भरायचा. केळीच्या कोंबासारख्या दिसणाऱ्या घवघवीत भरीव पोटऱ्यांकडं पाहिलं की, हृदय बंद पडायची वेळ यायची. कोरीव भुवया, नाजूक जिवणी, मोगरीच्या कळीसारखे दात, कोमल कंठ! आणि या सर्वांना साजेसं उघड्या दंडावर हिरवंगार गोंदण खुलून दिसत होतं. अशा या रंभावर माझी नजर पडली होती. एके दिवशी मी आमच्या परड्यात उभा राहिलो होतो. एवढ्यात रंभा डोक्यावर एक आणि कमरेवर एक अशा दोन कळशा घेऊन पाण्याला आली होती.

तिनं कळशी दोराला बांधली आणि माझ्याकडं पाहून असं काही मोहक हास्य केलं की बस्स! मला त्या वेळी अनावर मोह झाला. रंभा पाणी वर काढीत होती. त्यामुळं तिचे हात वरखाली होत होते. आणि त्यामळं जसं दिवसा सूर्याचं आणि रात्री चंद्राचं (अर्थात तृतीयेपासून पौर्णिमेपर्यंत) दर्शन होतं, तसंच मला एकवेळ डावीकडच्या तर दुसऱ्या वेळी उजवीकडच्या उरोजाचं दर्शन घडत होतं. ऐन ज्वानीमुळं तिचे उरोज तटतटत होते. त्या दोन चंद्रसूर्यांनी माझ्या डोळ्यावर मोहिनी जाळ पसरलं. ती पाणी उपशीत असतानाच मी एक बारीकसा खडा उचलून फेकला होता. तो बरोबर तिच्या छातीवरच्या फुगीर भागावर आदळला होता. त्या वेळी तिनं आजूबाजूला वळून कुणी नाही अशी खात्री करून घेऊन काहीशा लज्जेनं आणि खोट्या क्रोधानं माझ्याकडं पाहिलं होतं. क्रोधापेक्षा लज्जेची भावनाच त्यात जास्त होती.

तिला मी खुणेनं जवळ बोलावलं होतं. ती जवळ येताच मी एकदम तिला मिठी मारून तिच्या सर्वांगावरून अगदी हळुवारपणे बोटे फिरविली होती. माझ्या डोळ्यां-वर उन्मादाची धुंदी चढली होती. एका वेगळ्याच जगात वावरत होतो मी! किती तरी वेळ तिला हृदयाशी अगदी घट्ट धरून मी उभा होतो. आणि तीही अगदी निष्काळजीपणे आपल्या जीवनाची पूर्तता होत आहे या जाणिवेनं उभी होती. मनात आलं, 'हे सुकुमार दिसणारे गुलाबाच्या पाकळ्यांसारखे ओठ दातांनी कुस्करावेत आणि तू माझी होशील का? असं विचारावं!' या विचारानं मी तिची हनुवटी वर उचलली. तिच्या कोमल ओठांवर माझे ओठ टेकणार एवढ्यात रावजी विहिरी-जवळ दिसला. तेव्हा माझ्या डोळ्यांवरची धुंदी अगदी साफ उतरली. त्यानं आम्हा दोघांना खास पाहिलं होतं! रावजी दिसताच रंभा आमच्या घराच्या मागच्या बाजूनं परड्यातली तोडलेली अबोलीची फुलं आपल्या ओच्यात घेऊन जणू काही घडलंच नाही अशा थाटात आपल्या बापासमोर आली. आणि डोक्यावर एक आणि कमरेवर दुसरी कळशी घेऊन निघून गेली होती. त्यानंतर तिला त्यानं घराबाहेर पडू दिले नव्हते.

त्यानंतर काही दिवस मी गुपचूप बसलो होतो. तोही काही हालचाल न करता राहिला. पण रंभाचं लग्न उरकताच त्यानं आपला मोर्चा माझ्याकडं वळविला

होता. माझ्याबद्दल लोकांच्या मनात विषारी बीज रुजवीत होता. या गोष्टीला आजच्या घडीला जवळजवळ सहा सात वर्षं होऊन गेली होती. पण अजूनही रावजी माझ्या वाईटावर असल्यानं माझ्याबाबतच्या निरनिराळ्या कंड्या उठवीत होता. मला गोत्यात आणू पहात होता. सहा सात वर्षांपूर्वी रावजीशी माझं वैर निर्माण झाल्याचा चित्रपट आता माझ्या नजरेसमोर आज घडल्याप्रमाणं अगदी ताज्या स्थितीत उभा राहिला होता. माझ्या बद्दलचं हे विषारी बीज रावजीनं तर या वेड्याच्या मनात पेरलं नसेल ? असा दाट संशय आल्यावाचून राहिला नाही. ह्या थेरड्याचा खरपूस समाचार घ्यावा असं मनात आलं. पण ...... पण त्याची बरीच माहिती मला अज्ञात होती. ती मला जाणून घ्यायची होती. म्हणून मी म्हणालो,

“पण मी दुसऱ्याला त्रास देतोय किंवा आडमार्गानं जातोय असं म्हणतं कोण?”

“कोण म्हणतं ? मांजर डोळे झाकून दूध पितं. त्याला वाटतं आपणाला कुणी पहात नाही. पण त्याच्या पाठीमागं बडगा घेऊन मालक उभा आहे हे त्याला कसं समजेल ? तसंच तुझं आहे. लोक तुझ्याविरुद्ध काय बोलतात ? तुझ्यावर डाव टाकण्याची कशी तयारी करतात. याकडं तुझं लक्ष असतं तर तुझ्या प्रश्नाचं उत्तर तुझ्या मनानंच दिलं असतं. तू या गावात ज्या दिवशी मला दिसलास; जेव्हा मी तुझं बारकाईनं निरीक्षण केलं त्याच वेळी तुझ्याबद्दल माझ्या मनात एक वेगळ्या प्रकारची घालमेल सुरू झाली. आणि तुला दोन गोष्टी सांगून सन्मार्गाला लावावं असं वाटू लागलं. पण वेळच तशी योग्य येत नव्हती. आज संधी मिळाली. तुला सावध करणं मला योग्य वाटलं !”



# युद्धाकडून..........

## १५ ओळींचे पत्र

पण मध्यपूर्वेच्या राजकारणाचा सारा रंगच
या एका लहानशा पत्राने पालटून टाकला.

जी मध्यपूर्व लाभली नाही म्हणून
सेंट हेलिनामध्ये नेपोलियन हळहळला

जी हातची जाऊ नये म्हणून हिटलरने
आपला बिनीचा सेनानी झुंजवला

ती मध्यपूर्व
या एका पंधरा ओळींच्या पत्राने
आता धडाडून पेटणार होती.

या वाळवंटात आता रक्ताचे पाट
वाहू लागणार होते.

.........





# ....युद्धाकडे

अश्रूंचे पूर लोटणार होते....

## कशासाठीं ?

## कुणी लिहिले हे पत्र !

## कुणाला ?

मध्यपूर्वेच्या मरूभूमीवर
सांडलेल्या रक्ताश्रूंची
एक करुणभीषण कहाणी

लेखक : रा. म. शास्त्री

'माणूस' : १५ ऑगस्ट अंकापासून
क्रमशः सुरू.

"पण;-मला तुम्ही सावध करण्याची गरज नव्हती !" मी काहीशा रागानं म्हणालो.

"असं नको म्हणूस ! तुझी गाठ घेऊनच या जगातून नाहीसं व्हायचं असं मी ठरविलं होतं. पंधरा सोळा वर्षांपासून मी तुझा शोध करीत फिरतोय, तुझ्या शोधा-साठी मी सारा हिंदुस्थान पालथा घातला !"

आता त्याचा स्वर जड झाला होता. तो काय म्हणतोय; त्याच्या बोलण्याचा अर्थ काय ? याचा मला अजिबात थांगपत्ता लागत नव्हता. त्यामुळं मी भांबावून विचारलं.

"म्हणजे ? आपल्या बोलण्याचा अर्थ माझ्या डोक्यात नाही आला !"

"नाही समजणार त्याचा अर्थ तुला ! तुझं आणि माझं एक अतूट असं नातं असावं असं मला वाटतं !"

"काय असेल ते स्पष्ट बोला. कोडयात बोलू नका !" माझं आश्चर्य जसजसा तो बोलत होता तसतसं वाढत होतं.

"तुझी ऐकण्याची इच्छाच असेल तर ऐक ! ऐकतोस ना ?" त्यानं माझ्याकडं पाहून म्हटलं, तेव्हा मी होकारार्थी मान हलविली. याच्या बोलण्यात काय गूढ लपलं आहे, ते जाणून घेण्याची मला अनिवार इच्छा झाली होती. म्हणून मी जरासा सरकून बसलो. तेव्हा तो पुढं म्हणाला,

"तू माझा मुलगा आहेस !"

"त्याच्या या वाक्यानं मी भांबावून गेलो. तो जे बोलत होता त्यावर माझा अंशभरही विश्वास बसत नव्हता. 'हा वेडा माझा पिता' असणंच शक्य नव्हतं. माझा जन्मदाता एक जमीनदार होता. त्याचा वारसा आज माझ्याकडं होता. मनात आलं, "म्हणावं, वेडपटा लाज नाही वाटत मला आपला मुलगा म्हणा-यला ?" पण या विचाराला मी बंधन घातलं. त्यानं तशा अंधारातही माझी मुद्रा न्याहाळण्याचा प्रयत्न केला आणि पुढं म्हणाला,

"मी सांगतोय यावर तुझा विश्वास बसणार नाही. याची मला जाणीव आहे. कसा बसेल विश्वास ? तू एक जमीनदार ! सुशिक्षित ! आणि मी परिस्थितीमुळं बनलो वेडा. वेडयाचे विचार ते काय असणार ? वेडेच ! दुसरं काय ! तुला माहीत असेल आपला देश दीडशे वर्षे पारतंत्र्यात होता. नेहरू, गांधी, पटेल, नेताजी अशा थोर लोकांच्या प्रयत्नानं, त्यांच्या त्यागानं आपला देश स्वतंत्र झाला आहे. स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपलं सर्वस्व खर्च केलं, जे पारतंत्र्याच्या श्रृंखला तोडण्यासाठी अहोरात्र झटले, ते आपले गांधीजी ! आज सारं भारत राष्ट्र त्यांना राष्ट्रपिता म्हणून संबोधतं. पंधरा ऑगस्ट एकोणीसशे सत्तचाळीस साली भारत स्वतंत्र झाला. आणि तीस जानेवारी एकोणीसशे अठ्ठेचाळीस साली गांधीजींचा खून झाला. भारत एका अमोल रत्नाला मुकला. अखेरपर्यंत त्यांनी आपली जीवन

ज्योत स्वातंत्र्याकामी, दरिद्री नारायणाची सेवा करण्याकामी खर्ची टाकली. आपल्या जीवनज्योतीच्या प्रकाशातून स्वातंत्र्यातील लोकांना ध्येयाचा मार्ग दाखविला. त्या राष्ट्रपुरुषाचा खून झाला. खून होण्यापूर्वी हिंदू मुसलमानात झगडा चालू होता. त्याचवेळी गांधीजींचा खून झाला. जिकडंतिकडं कोलाहल माजला. चोहोकडं अंधार पसरला. जाळपोळीला आणि लुटालुटीला ऊत आला. कित्येकांना निर्धन बनविलं, तर कित्येकांना बेघर बनविलं. ब्राह्मण कुटुंब दिसलं की, त्याला मारपीट करायचं सत्र दंगलखोरांनी आरंभलं. तशातच एके दिवशी माझ्याही घरावर धाड पडली !"

त्याचा स्वर आता विलक्षण जड झाला होता. त्याच्या स्वरात अजूनही भीती असल्याचा भास झाला मला ! त्याच्या थंड स्वरात औदासीन्य ओतप्रोत भरल्यासारखं मला वाटलं. त्यानं आपल्या केसातून आणि दाढीतून वाळलेल्या काटकीसारखी बोटं एकवार फिरविल्यासारखं केलं आणि पुढं म्हणाला,

"त्यातच आमच्या सर्व कुटुंबाची धूळधाण झाली. माझी मोठी मुलगी पेटलेल्या घरात अडकली आणि त्यातच ती पंचतत्त्वांत विलीन झाली. त्या जाळपोळीतच चळवळीच्या लोकांनी तुला उचलून नेलं. आम्ही बेघर तर झालोच होतो. शिवाय निपुत्रिकही झालो होतो. मी आणि तुझ्या मातेनं खूप शोक केला. सगळीकडं फिरून तुझा तपास केला. पण तुझा पत्ता लागला नाही. त्यातच तुझ्या मातेला वेडाची बाधा झाली. कुठल्याच गोष्टीकडं तिचं लक्ष नसे. 'तो बघा विजय आला. मला हाक मारतोय. नका हो माझ्या विजयला मारू ! का छळता आम्हांला ? गांधीजींचा खून झाला, त्याच्याशी आमचा काय संबंध ? गांधीजींचा खून करा, असं का आम्ही ब्राह्मणांनी लोकांना सांगितलं होतं ? का त्रास देता बालकाला ? त्या कोवळ्या जिवानं कोणता तुमचा गुन्हा केलाय ? त्यानं गुन्हा केला असेल तर त्याचं प्रायश्चित्त आम्हांला द्या. नका त्याला फरफटत ओढत नेऊ !" असं तर कधी, 'विजय, अरे विजय ! माज्या लाजा, ऊठ बघू. माझा गुणाचा बाळ. अरे, इतका वेळ का झोपायचं असतं ? आता मोठा झालास. तुझं नाव आता शाळेत घालायचं. मग खूप शिकायचं, मोठं व्हायचं, अगदी नेहरू–गांधींसारखं !' असं वेडाच्या झटक्यात बडबडायची आणि मरणाच्या अखेरच्या घटकेला मला म्हणाली, 'माझ्या विजयला कुठं पाठवून दिलंत एकट्याला ? तुम्ही जायचं नाही का त्याच्याबरोबर ? आता इथं बसू नका. तो कुठं चुकला असेल तिथून शोधून आणा. त्याशिवाय मी तुमच्याशी एक शब्दही बोलणार नाही.' एवढंच ती माझ्याशी अखेरच्या घडीला बोलली आणि या जगाचा तिनं अखेरचा निरोप घेतला. मला तिच्या विजयला शोधून द्यायचं होतं, म्हणून मी फिरतोय. पण फिरता फिरता एकच प्रश्न माझ्या मनात गोंधळ माजवीत होता. आणि तो म्हणजे, सात वर्षांचा असताना विजय नाहीसा झाला. आता मी त्याला कसा ओळखेन ? ओळखायला माझ्याकडं एक खूण होती.

ती म्हणजे माझ्या विजयच्या डाव्या हाताचं बोट लहानपणी चाकूनं काकडी कापताना तुटलेलं होतं आणि लहानपणी पाळणा तुटल्यामुळं तो जमिनीवर नाकावर पडला होता. त्यामुळं त्याच्या नाकावरही स्पष्टशी खूण उमटली होती. शिवाय माझ्या विजयच्या डाव्या दंडावर पै एवढा काळा व्रण होता. तुझ्या दंडावर जर तू विजयच असशील तर तो डाग असेल. बघ ! या खुणांवरून मी तुला ओळखलं !"

नकळतच माझा हात नाकाकडं गेला. नाकावरच्या व्रणामुळं आणि तुटलेल्या बोटामुळं जर त्यानं मला आपला मुलगा मानला असता तर ते मी कधीही कबूल केलं नसतं. पण उघडचा न दिसणाऱ्या माझ्या दंडाच्या वरच्या बाजूला भुजेवरची खूण ज्या अर्थी सांगितली, त्या अर्थी बऱ्याच प्रमाणात यात खऱ्याचा अंश असावा, यात शंका नाही. असा माझ्या मनानं कौल दिला. सत्य परिस्थितीची मला जाणीव झाली. माझा जन्म देणारा पिता मला आज भेटत होता. त्यामुळं माझ्या घशात आनंदाचा आणि दुःखाचा आंवढा दाटून आला होता, बोलवत नव्हतं. माझ्या डोळ्यांतून खळकन एक टपोरा मोती निखळून पडला आणि त्याच्या पाठोपाठ कितीतरी ! आणि त्याच वेळी 'बाबा' अशी करुण किंकाळी मारून मी त्यांचे पाय धरले. त्यांनीही मला कडकडून मिठी मारली. मनात आलं, 'म्हणजे मी खरा जमीनदार नव्हतो तर !' वडिलांसंबंधी क्षणापूर्वी जे विचार माझ्या मनात आले होते, त्याबद्दल मनाला हळहळ लागून राहिली. त्याचं परिमार्जन कसं करावं ? हा विचार तशाही स्थितीत माझ्या मनात घोळत होता. क्षणापूर्वी मला ज्या श्रीमंतीचा अभिमान वाटत होता, त्या श्रीमंतीची मला घृणा वाटू लागली. कारण ती पापावर उभारली होती. गोरगरिबांच्या शापावर, रक्तावर उभारली होती. मी माझ्या खऱ्या वडिलांचे पाय धरून म्हणालो,

"बाबा, क्षमा करा मला, चुकलो मी !"

"अरे, चूक तुझी नाही, परिस्थितीची आहे ! तुला आपलं तुपलं समजायच्या वयात वेगळं बाळकडू मिळालं, म्हणून असं झालं ! मनाला वाईट वाटून घेऊ नकोस. तुझ्या आईला मी दिलेलं वचन पुरं झालं. आता मी कुठंही गेलो तरी, माझ्या पाठीमागं तुझ्या आईला स्मरून नमस्कार कर आणि सांग, 'माझा शोध बाबांनी लावला !' आता माझे या जगात अगदी थोडे दिवस उरले आहेत. उद्या मी माझ्या पुढच्या प्रवासाला निघणार आहे ! मला थोडं पाणी आणून पाजतोस ? माझा घसा सुकलाय बोलून !" त्यांनी असं सांगताच, मी जवळच्या घरातून पाणी पैदा करून त्यांना पाजलं.

"आता मी जातो शंकराच्या देवळात. तू म्हणशील घरी का येत नाही ? त्याचं कारण मी कुणाच्याही घरात प्रवेश करीत नाही. कुणी काही दरवाजाबाहेर दिलं तरच खातो. झोपायचं झालं तर उघड्यावरच झोपतो. मी उद्या इथून निघणार आहे. आपलं हे नातं तू कुणालाही सांगू नकोस ! कारण ते तुला घातक आहे.

लोकाना जर समजलं, तू तोतया जमीनदार आहेस हे; तर ते तुझा उठाव करतील. जपून वाग. कुणालाही त्रास देऊ नकोस. लोकांत मिळून मिसळून वागण्यातच तुझं हित आहे. जातो मी. उद्या सकाळी मला देवळात येऊन भेट!" असं म्हणून ते पाराच्या पायऱ्या उतरून चालू लागले.

घरी चलण्याबाबत मी त्यांना परोपरीनं विनविलं. पण व्यर्थ! म्हणे, 'माझ्या येण्यामुळं तुझ्या प्रतिष्ठेला बाध येईल.' 'पण मला प्रतिष्ठेची गरज आहेच कुठं? असं मी त्यांना बोलून दाखविलं. तेव्हा फक्त ते हसले आणि म्हणाले, 'वेडा आहेस तू!' असं म्हणून चालू लागले. मी त्यांच्या अंधारातून जाणाऱ्या आकृतीकडं ती आकृती पुसट होईपर्यंत पहात होतो. शेवटी उठलो आणि चालू लागलो. घरी येऊन घड्याळात पाहिलं; बारा वाजून गेले होते. जेवणाची जरुरी नव्हतीच, कारण पोटात आनंद भरलेला होता. एका रहस्याचा मला उलगडा झाला होता. माझ्या जन्मदात्यांचाच विचार त्या वेळी माझ्या मनात घोळत होता. माझ्या वडिलांना मी रात्रीचं पाठवून दिलं, हे बरं झालं नाही. असा माझ्या मनानं मला निर्वाळा दिला आणि उद्या सकाळी नाना प्रयत्न करून वडिलांना घरी आणायचंच, या विचारात माझा डोळा लागला.

सकाळी लवकर जागा झालो. तोंड वगरे धुवून बाहेर पडलो. शंकराच्या देवळा-समोर गर्दी जमली होती. आत कुणीही जात नव्हतं. मी आत गलो, आणि पाहत तो सारं आटोपल्याचं दिसलं. रात्रीचे माझ्या अज्ञात वडिलांनी उच्चारलेले शब्द मला आठवले. 'उद्या मी पुढच्या प्रवासाला निघणार आहे.' माझ्या डोळ्यांतून अश्रू घरंगळले. चटकन माझं लक्ष त्यांच्या हाताखालच्या चिठ्ठीवर गेलं. चिठ्ठी उघडली आणि वाचू लागलो.

'मी एवढ्यासाठीच तुझा शोध घेतला की, मला मरण्यापूर्वी तुझ्या हातचं पाणी प्यायचं होतं. तुझ्या आईची इच्छा पुरी करायची होती. ती इच्छा पुरी झाली. सुख उपभोगण्याचं काही उरलं नाही. सदैव सुखी हो!'

चिठ्ठीतील अक्षरं माझ्या हृदयावर कोरली जाऊ लागली. डोळ्यांत जखडून ठेवलेला अश्रूंचा बांध एकाएकी फुटला. लोक आश्चर्यचकित होऊन पहात होते की हे काय? पण माझं त्या मृतात्म्याशी असलेलं नातं त्यांना कुठून समजणार? त्यांनी माझ्या आईला दिलेलं वचन जसं पाळलं तसंच त्यांना दिलेलं वचन पुरेपूर पाळण्याची शपथ घेऊन मी जड...जड पावलानं घरी परतलो.

O

## जुनी पुराणे

# रामायणातील

प्रभू रामचंद्र वनवासात असताना लंकेचा राजा रावण याने सीतेचे हरण केले रामाने लक्ष्मण आणि वानरवीर यांच्या साहाय्याने रावणाशी घोर युद्ध करून रावणाचा शिरच्छेद केला आणि जानकीची मुक्तता केली. रामायणातील हे 'युद्धकांड' कोणाच्या परिचयाचे नाही ? आपल्या सर्वांना ही कथा माहीत आहे.

पण राम-रावणाचे हे युद्ध सुरू होण्यापूर्वी श्रीरामांना किती दिव्यातून जावे लागले याची आपल्याला काही कल्पना आहे काय ? 'युद्धकांडा'पूर्वी 'तडजोड-कांड' नावाचे एक स्वतंत्र प्रकरण रामायणात आहे. हे युद्ध होऊ नये, रामरावणात तडजोड घडावी असे अनेक प्रयत्न त्या वेळी झाले. 'अंगद-शिष्टाई' त्यातलीच.

पण त्याच्याहि आधी काही गोष्टी घडल्या होत्या.

सुग्रीवाशी मैत्री करून रामाने वालीचा वध केला आणि सुग्रीवाला त्याची बायको तारा परत मिळवून दिली. तेव्हापासून सुग्रीव हा वानरांचा मुख्य झाला. तथापि लाडकी बायको असल्यामुळे तारा वानरीजन सगळा कारभार पाहत असे. सीताहरण झाल्यावर वानरांची एक मोठी 'पार्टी–मीटिंग' भरली. पुढे काय करावे याची चर्चा सुरू झाली. श्रीरामप्रभू शोकमग्न असल्यामुळे या बैठकीस उपस्थित नव्हते. पण लक्ष्मणाची स्वारी धनुष्य घेऊन हजर होती.

चर्चा सुरू झाल्यावर ताराराणी म्हणाल्या,

"आपण आणि रावण यांचे फार वर्षांपासूनचे सख्य आहे अशा स्थितीत रावणानं ही गोष्ट करावी ही चिंतेची बाब आहे—

लक्ष्मण उसळून म्हणाला, "नुसती 'चिंतेची बाब आहे' असे म्हणण्याने काय होणार आहे ? रावण आपले धोरण बदलणार आहे काय ?—"

शेपटी वर करून मंत्रीगणातील एक वानर श्रेष्ठ बोलले,

"रावणाचा राजदूत किष्किधा नगरीत आहे. झालेल्या घटनेसंबंधी काळजी व्यक्त करणारे पत्र आपण त्याच्या हवाली केलं आहे. ते तो रावण महाराजांकडं पोचतं करीलच."

ताराकाकू म्हणाल्या, "अशी पत्रं लिहिण्यात आमच्या वानरांचा हातखंडा आहे.

# तडजोड-कांड

रावणाचे राज्य सीमेला लागूनच असल्यामुळं हल्ले, लुटालूट, कत्तली इ. कटकटी सदैव चालू असतात. त्यामुळे अशी हजारो निषेधाची पत्रे आतापर्यंत आम्ही पाठवली आहेत. तेव्हा पत्रे लिहिण्यात काही चूक झाली असेल अशी आपण कल्पनाच करून घेऊ नका ..."

ताराकाकूंच्या या निवेदनावर खूपच चर्चा झाली. काही डाव्या शेपटीची वानरे होती. त्यांचे म्हणणे पडले की, राम हा बोलूनचालून परक्या मुलखातून आलेला. त्याच्यासाठी आपण रावणाचा रोष ओढवून घेणं इष्ट होणार नाही. नळ, जांबुवंत यांच्यासारखी म्हातारी मुत्सद्दी मंडळी होती. त्यांनी सांगितले की, रावणाने केलेल्या या कृत्यामुळे किष्किंधेत फार खळबळ उडाली आहे. आपण या बाबतीत खुद्द सीतेचं मत काय आहे हे कळल्याशिवाय कसलीही उपाययोजना करणे इष्ट होणार नाही. वाटल्यास एक शिष्टमंडळ सीतेच्या भेटीस पाठवून तिची या प्रकारास संमती आहे काय, याची चौकशी करण्यात यावी. प्रवासखर्च आणि व्हिसा मिळत असेल तर आपण या शिष्टमंडळात जाण्यास तयार आहोत....

खूप भवती न भवती झाली. चर्चेचा गदारोळ उडाला. पण ताराराणी अधिक काही बोलेनात. कोठलाही ठराव करायला त्या तयार होईनात. असला काही ठराव केला तर रावणाचं मन दुखावेल असं त्यांचं म्हणणं पडलं. शेवटी हनुमंत संतापून म्हणाला,

" अहो राणीसाहेब, निदान हे कृत्य मित्रत्वाचं नाही एवढा तरी ठराव आपण करू या. या शब्दयोजनेला तरी काही हरकत आहे काय ? "

" छेः छेः ! "— ताराराणी तोंडावर हात घेऊन घाबरल्याचा अभिनय करीत उद्गारल्या. " भलतंच काहीतरी ! इतकी कडक शब्दयोजना वापरून कसं चालेल ! काही झालं तरी लंकेचं राज्य हे आपलं मित्रराष्ट्र आहे. आता त्यांनी असं करायला नको होतं हे बाई कबूल. पण– "

पुष्कळ वाद झाला. पण ठराव करण्याची गोष्ट बारगळलीच. ताराकाकू अजिबात ऐकेनात. शेवटी सौम्य शब्दात एक पत्र तेवढे पाठवायचे ठरले. त्याप्रमाणे अनेक वानर मुत्सद्द्यांनी रात्रंदिवस खल करून पुढीलप्रमाणे पत्र रावणाकडे धाडले—

"...... आपण अयोध्येचा राजपुत्र राम याची एकमेव पत्नी सीता तथा जानकी हिला लंका दाखवण्याच्या हेतूने निमंत्रण दिले व ती त्याप्रमाणे आपल्या समवेत लंकेस रवाना झाली असे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. याबाबतीत आपण सीतेची संमती घेतलेलीच असणार हे उघड आहे. तिचा पति जो राम त्याची संमती घेण्याचे आपण विसरले असण्याची शक्यता आहे. असे कधी कधी घडते, त्याचे विशेष काही नाही. पण बायकोला नेण्यापूर्वी नवऱ्याची परवानगी घेण्याची चाल आर्य लोकात आहे असे राम यांच्या बोलण्यावरून दिसते. आपला यापाठीमागे विशुद्धच हेतू असणार हे आम्ही राम यांना सांगितलेच आहे. तथापि उभयपक्षी गैरसमज टळावा म्हणून आपण अजूनही त्यांना औपचारिकरीत्या ही गोष्ट कळविल्यास बरे होईल. असो आपल्या या धोरणाने इकडे थोडीशी काळजी निर्माण झाली आहे. तिचे प्रमाण फार नाही असे आम्ही आश्वासन देतो. पण थोडी चिंता वाटतेच


ऐतिहासिक महत्त्वाच्या लेखांचे संकलन नि संपादन केलेला संग्राह्य ग्रंथ

## वीर सावरकर आणि गांधीजी

संकलन नि संपादक : बाळाराव सावरकर

ह्या ग्रंथ लवकरच प्रसिद्ध होईल.

प्रसिद्धिपूर्व मूल्य : [ १५ ऑगस्टपर्यंत : रुपये पाच
त्यानंतर २ ऑक्टोबरपर्यंत : रुपये सहा

**प्रसिद्धीनंतर रुपये पंधरा**

**ह्या पुस्तकातील विषय**

★ १९०८ ते १९४८ पर्यंतचे वीर सावरकर आणि गांधीजी यांचे संबंध ! ★ वीर सावरकरांनी गांधीजींच्या धोरणावर वेळोवेळी लिहिलेले 'गांधी गोंधळ' नि अन्य लेख ★ गांधीजींनी वीर सावरकरांसंबंधी लिहिलेले लेख—आठवणी ★ सावरकर–गांधी भेटीचे वृत्तांत ★ गांधीवध अभियोगातील वीर सावरकरांचे निवेदन ★ आणि वृत्तपत्रातील दोघांसंबंधीचे लेख.

**पाच रुपये पाठवून आजच आपली प्रत राखून ठेवा !**

बाळाराव सावरकर : वीर सावरकर प्रकाशन, सावरकर सदन,
७१, शिवाजी उद्यान, मुंबई–२८.

**की ! काहीतरी समजुतीचाच घोटाळा दिसतो. सीतेला आपण पाठवून ही चिंता दूर करावी अशी नम्र विनंती आहे. तसे त्या सावकाश परत आल्या तरी चालतील म्हणा ! पण राम यांची जेवणाखाण्याची बरीच आबाळ होत आहे, हेही ध्यानी ठेवल्यास बरे. आपले हे कृत्य शत्रुत्वाचे आहे असे आम्ही मुळीच मानीत नाही. ते अमित्रत्वाचे आहे असेही नव्हे. झाला प्रकार घडला नसता तर त्यातल्या त्यात बरे झाले असते इतकेच आमचे म्हणणे......"**

वानरसभेच्या जनरल मीटिंगमध्ये हा ठराव वाचून दाखवला जात असतानाच लक्ष्मण आणि हनुमंत यांची मुद्रा तांबडीलाल झाली. शेवटी क्षुब्ध होऊन लक्ष्मण ओरडला,

"बस् बस् ! पुरे करा हे वाचन, तुमच्या हातनं काय होणार आहे हे दिसतंच आहे, आम्ही दोघे भाऊ आहोत आणि आमची धनुष्ये आहेत. रावणाचं पारिपत्य करण्यास आम्ही समर्थ आहोत..."

लक्ष्मणाचा हा अवतार पाहून सगळेच दचकले. हनुमंत उभा राहून म्हणाला, "लक्ष्मणा, मी तुझ्या पाठीशी आहे. हा बायकी कारभार मलाही पसंत नाही. या ताराराणीच्या लाडेलाडे बोलण्यानं सगळ्या किष्किंधा नगरीत गोंधळ उडाला आहे. आमच्या मुत्सद्यांना तरी काही अक्कल असावी ! तेही तिच्यापुढे आपल्या शेपटीचा गोंडा घोळत असतात..."

हनुमंताच्या या स्पष्टोक्तीमुळे वातावरण फारच प्रक्षुब्ध झाले. डाव्या शेपटीच्या वानरांनी ताराकाकूंचा जयजयकार सुरू केला. हनुमंताने सगळ्यांना चोपून काढले. खूप गोंधळ उडाला. मारामाऱ्या झाल्या. तेवढ्या गडबडीत ताराराणी एक नवी साडी वदलून परत आल्या. पण दंगा चाललाच. शेवटी काकूंना ताकीद देऊन बाहेर काढण्यात आले. सुग्रीवाच्या हातात परत सूत्रे आली. मग शिष्टाईसाठी अंगदाला पाठवायचे ठरले. शिष्टाई अयशस्वी झाली तर युद्ध हाच पर्याय सगळ्यांनी एकमताने मान्य केला !

पुढचे रामायण सगळ्यांना ठाऊक आहेच !

रावणाचा वध करून राम सीतेला घेऊन पुष्पक विमानाने अयोध्येला निघाले. विमान किष्किंधेवरून गेले. सगळीकडं आनंदीआनंद दिसला. रामाने विमान थोडे खाली घेण्यास सांगितले. राजप्रासादावरून विमान गेले तेव्हा ताराराणी स्वैपाकघरात बिनबोभाट स्वैपाक करताना दिसल्या !

तडजोड—कांडात वरील वृत्तांत आढळतो.

तात्पर्य – ज्याचे काम त्याने करावे नाही का ? म्हणजे सगळ्यांचेच भले होते.

O

– द. मा. पुराणिक



# रूपवती भार्या शत्रुः!

*भवितव्याबद्दल साशंक असलेल्या पलविंदरने पाण्यासारखा पैसा खर्चून अत्यंत बुद्धिमान वकील आपल्या बचावासाठी नेमला. उलटसुलट सवालजबाब होऊन सरकारी वकिलानं कोर्टाला आपलं निवेदन सादर केलं. पलविंदरचं दैवी सौंदर्य लक्षात न घेता कोर्टानं तिला फाशी सुनवावी असं मोठ्या प्रभावीपणानं त्यांनी सुचवलं.*

*पलविंदरचं अवसान नाहीसं झालं. परंतु भवितव्यता मात्र तिच्याकडे सस्मित पाहत होती. तिच्या बुद्धिवान वकिलानं आपल्या बुद्धिचातुर्यानं कोर्टात पारडं असं काही फिरवून टाकलं की न्यायमूर्ती बेदी पलविंदरवरील खुनाच्या आरोपाबाबत संभ्रमित झाले—*

गाजलेल्या जसपालसिंग खून खटल्याचा आज निकाल लागणार होता. न्यायमूर्ती बेदी यांच्या एकंदर चर्येवरून पलविंदरकौरवर त्यांचा विशेष राग असावा व जसपालसिंगाच्या खुनात तिचा हात असला पाहिजे याबद्दल त्यांची खात्री झाली असली पाहिजे असं स्पष्ट मत सामान्य माणसं आपसात चर्चा करून बनवीत होती! त्यांचा तो अंदाज चुकीचा नव्हता! पतीच्या खुनाबद्दल पलविंदरकौर फाशी जाणार की निर्दोष सुटणार याची कुतूहल वाढवणारी चर्चा कोर्टाच्या आवारात हलक्या आवाजात चालू होती!

......घड्याळाचा काटा ११ वर सरकला आणि न्यायमूर्ती बेदी निकाल सांगण्यासाठी स्थानापन्न झाले! सेशन्स कोर्टात मुंगी शिरायला जागा नव्हती! आरोपी पलविंदरकौरला बरेच लोक आपणाकडे पहात आहेत याची जाणीव होती! भवितव्यात काय आहे? या भीतीपेक्षा तिची सौंदर्यप्रीती अधिक श्रेष्ठ ठरत होती! ती बसतानाच अशा तऱ्हेने बसली, की पाहणाऱ्याला वाटावं की केवळ विविध वेषातच नव्हे तर आरोपीच्या लाकडी पिंजऱ्यात देखील ती अधिक सुंदर दिसते!

# लेखांक सहा
## ॲडव्होकेट माधव कानिटकर

- ......घड्याळाचा काटा १२॥ वर गेला ! न्यायमूर्ती बेदी यांचे अत्यंत हळू आवाजात बाहेर पडणारे शब्द मागे कुणालाच ऐकू येत नव्हते ! वकील वर्ग, वृत्तपत्रांचे वार्ताहर, पर्लविंदरकौरचे आप्त-स्वकीय कान देऊन ऐकत होते ! टाईप-रायटर खडखडत होता ! जवळ जवळ १॥ तास झाले तरी ' जजमेंट ' चालू होतं ! आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेने न्यायमूर्ती बेदी पुराव्याची छाननी करीत होते. घटनांची संगती, खरे-खोटे पणा, शक्यता-अशक्यता, साक्षीदारांचे वर्तन, त्यांनी सांगितलेल्या घटना विश्वासार्ह की अविश्वासार्ह, प्रत्यक्ष खून झाला त्या वेळी काय घडलं असावं ? ' कबुलीजबाब ' म्हणजे काय ? कायदा काय म्हणतो ? याची चिरफाड आणि चिकित्सा चालू होती ! अखेर सुमारे १॥ वा. निकाल जाहीर झाला ! न्यायमूर्ती बेदी यांनी आरोपी पर्लविंदरकौरला दोषी ठरविले ! दुभाष्याने—जरूर नसताना—तो निकाल आरोपीला तिच्या भाषेत समजावला, " आरोपी पर्लविंदर-कौर ! आपल्या पतीचा हेतूपुरःस्सर आणि जाणूनबुजून खून करून त्यानंतर खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने त्याच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केल्याचे आरोप तुझ्यावर संशयातीत रीत्या सिद्ध होत आहेत ! सबब इं. पि. को. कलम ३०२ व २०१ अन्वये तुला खुनाबद्दल जन्मठेप ! आणि इं. पि. को. २०१ अन्वये ७ वर्षे सक्तमजुरी ! अशी शिक्षा ठोठावण्यात येत आहे ! दोन्ही शिक्षा एकदम भोगायच्या आहेत ! "

न्यायमूर्ती बेदी यांनी आपल्या निकालपत्रात बचावाची रेवडी उडवली होती ! सरकारी डॉक्टर उलटतपासणीत कोसळले होते ! जसपालसिंग पोटॅशियम सायनाईड-मुळे नव्हे तर दुसऱ्याच कुठल्यातरी कारणामुळे मेला असेल असे वाक्य ते बोलले होते हे खरे " पण पर्लविंदरकौर स्वतः तिच्या ' कबुलीजबावात ' म्हणत होती की तिचे पती ' अपघातान ' पण पोटॅशियम सायनाईड पिऊनच गेले ! आता तो अपघात होता तर त्यानंतर पर्लविंदरकौरचे वर्तन कसे होते ? त्यासाठी एकही बचावाचा साक्षिदार तिने पुढे आणलेला नाही ! तिला सासऱ्याची भीती खरोखरच वाटत असती, तर तिने हा प्रकार, उगाच आपल्यावर बालंट नको म्हणून सासऱ्याला कळवला असता, पण तिने केले काय ? तर सासऱ्याला अंधारात ठेवले ! प्रेताची विल्हेवाट लावून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला ! शिक्षण आणि संस्कार यांना डावलून समाजातल्या वरच्या वर्गातले लोक जेव्हा असले हिडीस गुन्हे कर-तात तेव्हा त्यांना कडक शिक्षाच ठोठावली पाहिजे ! प्रस्तुत खटल्यात आरोपी

पर्लविंदरकौर विवहिता आहे ! स्वतःच्या वासनेसाठी तिने प्रत्यक्ष पतीचा–एका निरपराध तरुणाचा–अमानूष खून करून त्याच्या प्रेताची देखील विटंबना केली आहे ! अशा गुन्ह्याला वस्तुतः ‘ मरेपर्यंत फाशी ’चीच शिक्षा योग्य ठरली असती पण आरोपी पर्लविंदरकौर ही ‘ स्त्री ’ आहे ही गोष्ट लक्षात घेऊन मी तिला ‘ जन्मठेप ’ दिली आहे ! ”

...... जन्मठेप ! पर्लविंदरकौरच्या डोळ्यांसमोर अंधार पसरला ! श्रीमंत बापाची मुलगी आणि जहागिरदाराची सून अनेक वर्षं तुरुंगात काम करणार ! भोगविलासाच्या सुखाला चटावलेलं हे शरीर अखेर तुरुंगात सडणार ! ...कदाचित आपण तिथेच मरणार ! पर्लविंदरकौरने तावडतोब निर्णय घेतला की या शिक्षेविरुद्ध पंजाब हायकोर्टात अपील करायचं ! फांशीच्या स्तंभावरून तिला यशस्वी रीत्या खाली उतरविणाऱ्या सेशन्स कोर्टातल्या वकिलाला तिने रजा दिली ! आणि पंजाब हायकोर्टात नावाजलेले अ‍ॅडव्होकेट जयगोपाल सेठी यांना वकीलपत्र देऊन तिने अपील दाखल करायला सांगितले ! सदरहू अपील पंजाब हायकोर्टाचे न्यायमूर्ती भंडारी व न्यायमूर्ती सोनी या ‘डिव्हिजन बेंच’ पुढे सुनावणीसाठी आले ?

अ‍ॅड. जयगोपाल सेठी यांनी त्यांच्या नेहमीच्या कुशाग्रबुद्धिमत्तेने आणि कौशल्याने पर्लविंदरकौरची बाजू मांडली ! (Mr. Sethi argued his client's case with his usual gusto and masterly skill ! ) सुरवातीलाच त्यांनी तडाखेबंद हल्ला चढवून मुद्दा मांडला की खालच्या कोर्टाचे न्यायमूर्ती बेदी यांचे मन वृत्तपत्रांतल्या विकृत लिखाणामुळे आणि विधानसभेतल्या चर्चेच्या प्रसिद्धीमुळे अगोदरच कलुषित झाले होते ! माझ्या अशिलाचे दैवी सौंदर्य तिच्या आड येत आहे ! सेशन्स जज्ज निकालपत्रात काय म्हणतात ते पहा “ I think her seductive charm and beauty is the most telling peace of evidence against her ! ” मिलॉर्ड ! सबंध पुरावा आपण एकदा वेगळ्या दृष्टिकोनातून पहा ! आरोपी पर्लविंदरकौर निर्दोष ठरेल ! आरोपीने मॅजिस्ट्रेट पुढे दिलेल्या तथाकथित ‘ कबुलीजबाबात ’ खूप विसंगती आहेत त्यांचे स्पष्टीकरण आरोपीकडून घेण्यात येण्याऐवजी तो कबुलीजबाबच तिच्या विरुद्ध मानण्यात आला ! ...... हायकोर्टाच्या दोन्ही न्यायमूर्तींनी खालच्या कोर्टाचे रेकॉर्ड (Notes of evidence) तपासले ! वकीलसाहेबांच्या म्हणण्यात थोडं तथ्य होतं ! पर्लविंदरकौरचे अपील दाखल झाले ! (Appeal was admitted ! ) आणि आरोपी पर्लविंदरकौरला पंजाब हायकोर्टात न्यायमूर्तींसमोर हजर करण्याचा हुकूम बंदिपालावर सुटला ! त्या निमित्ताने का होईना, “ अतिशय सुंदर ”, “ कामुक प्रेयसी ”, मादक विवाहिता ”, “ दैवी सौंदर्य ” या विशेषणांना (! ) भूषविणाऱ्या पर्लविंदरकौरला अगदी जवळून ‘पाहण्याची’ संधी उभय न्यायमूर्तींना मिळाली ! (The Judges did, however have the advantage of seeing the



'मिलॉर्ड ! जसपालसिंगाचा 'खून'च सिद्ध होत नाही !
मग पुरावा नष्ट करण्याचा प्रश्नच कुठे येतो ?'

attractive wrong doer and observing her demeanour from closer Quarters ! )

ॲडव्होकेट जयगोपाल सेठी यांनी सतत आठ दिवस बचावाचे भाषण केले ! पलविंदरकौरचे दृष्ट लागण्यासारखे सौंदर्य आणि मोहिंदरपालसिंगाचा पाजीपणा ! या गोष्टींवर त्यांनी जास्त भर दिला ! कबुलीजबाब म्हणजे काय ? या विषयावर सुप्रीम कोर्ट काय म्हणते ? याचे अनेक साधार दाखले (Authorities) दिले ! आणि शेवटी बिनतोड मुद्दा मांडला, की पलविंदरकौरचा कबुलीजबाब हा कबुलीजबाबच नव्हे ! पुराव्याच्या दृष्टीने त्याला किंमतच नाही ! आणि आहे असं मानलं तरी देखील ( Presuming without admitting ! ) त्यावरून ती दोषी ठरत नाही !

...... न्यायदेवतेने हातातला तराजू थोडा झुकवला ! पंजाब हायकोर्टाने निकाल दिला की खुनाचा आरोप पलविंदरकौरवर सिद्ध होत नाही ! पुरावा खरा मानला तरी फार फार तर असं म्हणता येईल, की तिला पतीच्या खुनाचं ज्ञान होतं ! पतीचा खून तिने केला असा पुरावा नाही ! ( Even if the evidance is believed in its entirety, there was a good case against Mohindarpal only. Palvindarkaur could

be credited with the knowledge of the crime, but not with any measure or participation in it !) आरोपी पर्लविंदरकौर हिचा प्रियकर आतेभाऊ (!) मोहिंदरपालसिंग याने एकट्यानेच हा खून केला असेल असा संशय यायला जागा आहे! सबब पतीच्या खुनाच्या आरोपातून तिची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे!...... मात्र पतीच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याचा तिने स्वतः प्रयत्न केला आणि तो देखील खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने याबद्दल संशयातीत भरपूर पुरावा आहे, म्हणून खालच्या कोर्टाने आरोपी पर्लविंदरकौरला दिलेली ७ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा हे कोर्ट कायम करीत आहे!

वृत्तपत्रातून पुन्हा एकदा मथळे झळकले,

"पंजाब हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निकाल!"

"आरोपी पर्लविंदरकौर खुनाच्या आरोपातून मुक्त!"

"७ वर्षे सक्तमजुरीवर हायकोर्टाचे शिक्का मोर्तब!"

फाशीवरून जन्मठेप आणि जन्मठेपेवरून फक्त ७ वर्षे सक्तमजुरीपर्यंत पलविंदरकौरची शिक्षा खाली आली! आणि तरीदेखील तिला फार फार दुःख झाले! ७ वर्षे! काय लहान सहान कालखंड आहे? ७ वर्षे हे नाजुक हात चटया विणणार, कागदाची पाकिटं तयार करणार, तयार कपड्यांच्या ढिगाला बटणं लावून देणार! मसाला कुटणार, ७ वर्षं! जे सुंदर शरीर सुगंधी अत्तराच्या सुवासात, मच्छरदाणीत, पंख्याखाली, परपुरुषाच्या मिठीत घुसमटलं आणि सुख देऊन गेलं ते शरीर घोंगडीवर झोपणार, डास आणि ढेकूण त्याच शरिराला हैराण करणार! तुरुंगातलं घाणेरडं अन्न आपण खाणार! जिने अनेक नोकरांना हुकूम सोडले तिला जेलर हुकूम देणार! रूपगर्वितेचा गर्व न्यायमूर्तींनी हरण केलाच होता आणि तिच्या आवडीचं तिचं रूप हरण करणार होता बंदिपाल! आणि एवढं करून बाहेर आल्यावर लोक म्हणणार, "होच बरं का ती पर्लविंदरकौर! जी एका खून खटल्यात ७ वर्षं सजा भोगून आली!" पतीच्या 'खुनाचा' ठपका अजूनही दूर होत नव्हता! तिने या शिक्षेविरुद्ध—पंजाब हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध— सुप्रीम कोर्टात अपील करण्याचा निर्णय घेतला! कुठलंही अपील सुप्रीम कोर्टात–भारताच्या सर्वोच्च न्यायालयात—दाखल करून घ्यायचं असलं तर त्याला राज्याच्या हायकोर्टाची परवानगी लागते! ॲड. जयगोपाल सेठी यांनी पंजाब हायकोर्टात आरोपी पर्लविंदरकौरतर्फे असा अर्ज दाखल केला, की पंजाब हायकोर्टाच्या निर्णयाविरुद्ध सुप्रीम कोर्टात अपील करण्याची आपणाला परवानगी असावी! आणि इं. पि. को. कलम ३०२ मधून —खुनाच्या आरोपातून— आरोपी पर्लविंदरकौरची मुक्तता झाली असल्यामुळे व कलम २०१ खालील ७ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा ही सुप्रीम कोर्टात अपील कर-

ण्याच्या योग्यतेची नसल्यामुळे पर्लविंदरकौरचा हा अर्ज पंजाब हायकोर्टाच्या डिव्हिजनल बेंचने फेटाळला ! पण अॅड. जयगोपाल सेठी म्हणजे कोणी साधा वकील नव्हता ! ताबडतोब विमानाने ते दिल्लीला रवाना झाले ! त्यांना ठाऊक होते की सुप्रीम कोर्टात अपील करण्यासाठी हायकोर्टाची परवानगी हा केवळ प्रोसीजर आहे ! तसा अर्ज हायकोर्टाने नाकारला तरी देखील सुप्रीम कोर्ट स्वतःच्या अखत्यारात दाखल करून घेऊं शकतं ! फक्त हायकोर्टाला तसा अर्ज केला गेला असला पाहिजे ! परवानगी मिळो वा न मिळो, सुप्रीम कोर्टाचा दरवाजा त्यांना बंद नव्हता !

...भारताच्या सर्वोच्च न्यायालयात अॅड. जयगोपाल सेठी यांनी बिनतोड युक्तिवाद केला की, ज्या वेळी एकाच आरोपीवर एक खुनाचा व दुसरा अन्य कुठला आरोप असतो तेव्हा खुनाच्या आरोपातून हायकोर्टाने निर्दोष मुक्तता केली असली तरी देखील उरलेल्या आरोपावर सुप्रीम कोर्टात अपील करण्याचा आरोपीचा हक्क अबाधित रहातो ! कारण त्याला झालेली शिक्षा ही एका 'खून' खटल्यातच झालेली असते !—— मग ती शिक्षा कितीही सौम्य असो ! ......सुप्रीम कोर्टाच्या पाचही न्यायमूर्तींनी (फुल बच !) पर्लविंदरकौरच्या वकिलांचे हे म्हणणे मान्य करून स्वतःच्या अखत्यारात (original Jurisdiction !) पर्लविंदरकौरचे अपील अॅडमिट करून घेतले !

...आता अॅड. जयगोपाल सेठी यांचे काम बरेच सोपे झाले होते ! त्यांना मुख्य धास्ती होती की सुप्रीम कोर्ट अपील अॅडमिट करून घेते की नाही ! या अपीलाचा अभ्यास, चिंतन आणि मनन करताना त्यांना एक अचूक मुद्दा सापडला होता ! सुप्रीम कोर्टात त्यांनी तो 'बाण' अचूक सोडला ! "मिलॉर्ड ! पंजाब हायकोर्टाने इं. पि. को. कलम २०१ खाली खुनाचा पुरावा नष्ट करणं किंवा तसा प्रयत्न करणं या आरोपावरून आरोपी पर्लविंदरकौरला ७ वर्षं सक्तमजुरीची शिक्षा फर्मावली आहे व त्याविरुद्ध न्याय (!) मागण्यासाठी मी आपणापुढे आलो आहे ! मिलॉर्ड ! इं. पि. को. कलम २०१ खाली शिक्षा देण्यापूर्वी प्रथम कुणाचा तरी खून झाला हे सिद्ध झालं पाहिजे तरच खुनाचा पुरावा नष्ट करण्याचा प्रश्न उपस्थित होतो ! पण या खटल्यात जसपालसिंगाचा खून झाला असं अजून सिद्ध झालेलं नाही ! सिद्ध एवढंच झालं आहे की जसपालसिंग मेला ! आरोपी पर्लविंदरकौरची खुनाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता झाली आहे ! दुसरा आरोपी मोहिंदरपालसिंग अजून फरारी आहे ! अशा परिस्थितीत जसपालसिंगाचा 'खून'च सिद्ध होत नाही ! मग 'खुनाचा' पुरावा नष्ट करण्याचा प्रश्न उपस्थितच होत नाही !" अॅड. जयगोपाल सेठी यांच्या या मुद्याचा अखेर विजय झाला ! खुनाच्या आरोपातून पंजाब हायकोर्टाने तिची निर्दोष मुक्तता केलीच होती ! आता सुप्रीम कोर्टाने तिची दुसऱ्या शिक्षेतूनही निर्दोष मुक्तता केली ! पर्लविंदरकौर संपूर्ण निर्दोष सुटली ! आपल्या निकालपत्रात भारताचे सुप्रीम कोर्ट म्हणते,

"In our Judgement there is no evidence to establish affirmatively that the death of Jaspal was caused by Potassium Cyanide, and that being so, the charge under Section 201 I. P. C. must also tail!"

......सुप्रीम कोर्टाचा निकाल पंजाबच्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाला तेव्हा सामान्य लोक हळहळले ! न्यायदेवतेने पर्लविपरकौरला न्याय देताना डोळे मिटले असले तरी त्यामुळे केवळ मृत जसपालसिंगावरच नव्हे तर त्याच्या प्रेतावर देखील अन्याय झाला ! कायद्याच्या इतिहासात असे घडू शकते ! 'गुन्हेगार' निर्दोषी सुटतो ! सामान्य लोकांचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास उडतो ! कारण त्यांना 'पुरावा' म्हणजे काय याचं कायदेशीर ज्ञान नसतं ! त्यांना वाटतं आणि वाटलंच की पर्लविंदरकौर श्रीमंत असल्यामुळे ती हजारो रुपये खर्च करून सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊ शकली ! सामान्य गरीब माणसांनी काय करायचं ? कायद्यापुढे 'स्त्री' आणि 'पुरुष' सारखेच आहेत ना ? मग पर्लविंदरकौर केवळ 'स्त्री' आहे म्हणून तिला सेशन्स जज्जांनी फाशीऐवजी जन्मठेप दिली हा कुठचा न्याय ? हा अन्यायच नाही का ? मोहिंदरपालसिंग इथून पुढे कधी पकडला जाईल का ? पकडला गेलाच तर त्याच्यावर खटला होऊन त्याला देहान्त शासन होईल का ? जसपालसिंगाच्या अतृप्त, निरापराध आत्म्याला शांती मिळेल का ? असले गंभीर प्रश्न उपस्थित झाले ! जसपालसिंगाच्या खुनाच्या आरोपावरून मोहिंदरपालसिंग फांसावर लटकला तरच या खटल्यात 'न्याय' होणार आहे, हा खटला पुन्हा एकदा प्रसिद्धीच्या प्रकाशात येईल का ? पण हे सर्व प्रश्न तूर्त उपस्थित होत नाहीत ! कारण मोहिंदरपालसिंग अजूनही फरारी आहे ! पंजाब सरकारने या खटल्यात हस्तक्षप केला काय ? नरो वा कुंजरो वा ! पर्लविंदरकौर सध्या कुठे आहे, कुठल्या प्रकारचे जीवन जगते हे कळायला मार्ग नाही. पंजाब हायकोर्टाच्या दगडी इमारतीवर डोळ्यांवर पट्टी बांधलेली, एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात तराजू घेतलेली न्यायदेवतेची सुंदर मूर्ती आहे ! त्या न्यायदेवतेच्या हातातील तराजूचा काटा नेहमीच मध्यावर असतो !......मात्र जसपालसिंग खून खटल्याचा निकाल ठाऊक असलेली एखादी सामान्य व्यक्ती पंजाब हायकोर्टाच्या भव्य दगडी इमारतीच्या जवळून जाताना जेव्हा जेव्हा त्या न्यायदेवतेच्या पुतळ्याकडे पाहते तेव्हा त्याला 'निर्दोष' (!) सुटलेल्या पर्लविंदरकौरची आठवण होते. त्याच्या मनाचा तडफडाट होतो ! ......जसपालसिंगाचं भेसूर प्रेत त्याच्या डोळ्यांसमोर येतं ! ... ... आणि त्याच्या मनात उगाचच विचार येऊन जातो की न्यायाचा हा काटा वाटतो तसा स्थिर नाही ! ...तो एका बाजूला झुकलेला आहे ! असा कितो तरी वेळ भास होत रहातो !

## स मा प्त

# भारत, पाकिस्तान आणि चीन

[ पृष्ठ २३ वरून ]

चर्चा करण्याच्या अगोदर शेतीच्या क्षेत्रातील पाकिस्तानच्या कामगिरीची तपासणी करू आणि पाकिस्तानच्या वतीने केल्या जाणाऱ्या दाव्याला उपलब्ध आकडेवारी पुष्टी देते का ते पाहू. आपण अगोदर पाहिलेल्या माहितीप्रमाणे, हे तर सत्य आहेच की, १९५९–६० नंतरच्या काळात शेती उत्पादनाच्या वाढीचा दर अगोदरच्या काळातील दरापेक्षा बराच वरचा होता आणि दुसऱ्या योजनेच्या काळात गाठलेल्या एकंदर वाढीच्या उच्च दरांमध्ये शेतीचा वाटा महत्त्वाचा होता. आता आपल्याला असा विचार करावयाचा आहे की, या माहितीवरून शेतीविभागातील प्रवाहाविषयी आपल्याला काय निष्कर्ष काढता येतील ?

आरंभाला कदाचित हे नमूद करावयाला हवे की, १९५९–६० च्या नंतरही पाकिस्तानात उत्पादनवाढीचा दर दरसाल ३ टक्क्यांपेक्षा थोडासाच जास्त होता. शेतीमध्ये ज्या देशांनी जलद वाढ साधली आहे अशा देशांशी तुलना करता हा दर फारसा उच्च नाही. भारतानेसुद्धा पाकिस्तानपेक्षा दीर्घ कालावधीवर दरसाल ३ टक्के चक्रवाढदराने शेतीउत्पादनात वाढ केली आहे. त्यामुळे वर उल्लेखिलेल्या कालखंडात पाकिस्तानने शेतीउत्पादनवाढीत मुसंडी मारली आहे, किंवा कोणत्याही दृष्टीने वाढीचा हा दर असामान्य आहे, असे मानणे अतिरंजित ठरेल.

कृषिउत्पादनाची पीकवार तपासणी केली तर हे स्पष्ट दिसते की, पाकिस्तानातील गेल्या काही वर्षांतील अन्नधान्य उत्पादनाची पातळी ही पंधरा वर्षांपूर्वीच्या पातळीपेक्षा म्हणण्याजोगी वर गेलेली नाही. १९५०–५१ मध्येच पाकिस्तानात गव्हाचे उत्पादन ४० लाख टन होत होते; १९६३–६४ मध्ये उत्पादनाची पातळी जवळपास तेवढीच होती आणि १९६४–६५ मध्ये उत्पादन फक्त ४४ लाख टन एवढेच होते. झाले ते एवढेच की, मध्यंतरीच्या काळात प्रतिकूल हवामान आणि इतर काही कारणांमुळे गव्हाच्या उत्पादनाची पातळी बऱ्याच प्रमाणात खाली गेली होती (१९५२–५३ या साली २४ लाख टन व १९५४–५५ मध्ये ३२ लाख टन इतकी ती खाली गेली होती.) ती गेल्या काही वर्षांत उंचावली आणि आज पूर्वीच्या कमाल उत्पादनाच्या काहीशी वर गेली आहे.

तांदुळाच्या उत्पादनात मात्र म्हणण्याजोगी वाढ दिसून येते. १९५९–६० सालच्या अगोदरच्या कालखंडात १९५३–५४ या सालात तांदुळाचे सर्वांत जास्त, म्हणजे ९२ लाख टन उत्पादन झाले. या पातळीवरून १९६०–६१ सालात हे उत्पादन

१०५ लाख टनांवर गेले आणि, १९६२–६३ सालात ही पातळी काहीशी खाली जाऊन, १९६३–६४ व १९६४–६५ साली परत ही पातळी वर गेली. या दोन वर्षी उत्पादन ११० लाख टनांहून अधिक झाले. अशा प्रकारे १९५९–६० सालानंतरच्या काळात तांदुळाच्या उत्पादनात १७½ टक्के वाढ झालेली दिसते.

तथापि भारतातील तांदुळाची उत्पादनवाढ पाकिस्तानपेक्षा बरीच चांगली आहे. १९४९–५० या भरघोस पिकाच्या वर्षी तांदुळाचे उत्पादन २५० लाख टनांपेक्षा काहीसे जास्त होते. ही पातळी १९५३–५४ मध्ये जवळजवळ ३०० लाख टनांपर्यंत गेली. १९५९–६० सालात ही पातळी सुमारे ३२० लाख टनांवर गेली, तर १९६४–६५ मध्ये तांदुळाचे उत्पादन ३८५ लाख टनांहून अधिक झाले. म्हणजे १९४९–५० सालापासून १९५९–६० पर्यंतच्या काळात उत्पादनात ५० टक्क्यांहून अधिक वाढ झाली. १९५९–६० सालानंतरची वाढही (सुमारे २२ टक्के) शेकडेवारीत पाकिस्तानपेक्षा जास्त आहे.

किंबहुना, १९४९–५० ते १९५३–५४ या वर्षांत पाऊसपाणी चांगले झाल्यामुळे तांदुळाच्या उत्पादनात जितकी टक्के वाढ भारतात झाली तितकीच टक्के वाढ साधारणत: अलीकडील काही वर्षांत पाकिस्तानात झाली आहे. येथे हे ध्यानात धरावे की, भारतात पहिल्या योजनेच्या काळातील अनुभवावरून शेतीउत्पादनवाढीच्या दराविषयी उच्च अंदाज बांधले गेले पण ते चुकीचे ठरले. पाकिस्तानातील परिस्थिती कदाचित यापेक्षा वेगळी सिद्ध होईल. परंतु या अनुभवावरून निदान इतके म्हणता येईल की, काही ठराविक वर्षांचा अनुभव जमेस धरून भविष्याविषयी अंदाज करताना बरीच सावधानता बाळगणे आवश्यक आहे.

आणखीही एका कारणासाठी सावधानतेची आवश्यकता आहे. पाकिस्तानचा बहुतेक तांदूळ पूर्व पाकिस्तानात पिकतो. तेथे अलीकडील वर्षांत, लागवडीखालील जमिनीत तसेच रासायनिक खतांसारख्या उत्पादनसाधनांच्या वापरात म्हणण्याजोगी वाढ झालेली नाही. त्यामुळे उत्पादनवाढीच्या दरात जी एकदम वाढ झाली तिचे नैसर्गिक हवामानाची अनुकूलता हे कारण असले पाहिजे असे म्हणता येते.

प्रत्यक्षात, कृषितंत्रात झालेले उल्लेखनीय बदल पश्चिम पाकिस्तानात घडून आले आहेत असे उपलब्ध पुराव्यावरून दिसते. या भागात नलिकाकूपांच्या संख्येत भूमितिश्रेणीने वाढ झाली आहे आणि ह्यातील बरेचसे नलिकाकूप १९५९–६० च्या नंतरचे आहेत. अलीकडील एका अंदाजाप्रमाणे पश्चिम पाकिस्तानात १९५९–६० साली खाजगी नलिकाकूपांची संख्या फक्त ४,००० होती. १९६४ च्या मध्यापर्यंत ती २५,००० पर्यंत गेली. यांतील बरेचसे कूप पश्चिम पाकिस्तानच्या उत्तर भागात खोदले गेले. इतर ठिकाणी सहसा न आढळणारे जमिनीखालील गोड्या पाण्याचे साठे या विभागात विपुल प्रमाणात आहेत. ह्याचबरोबर, नलिकाकूपांच्या जोडीने या भागात उत्पादन वाढविण्याकरिता रासायनिक खतांचा वापर बऱ्याच

मोठ्या प्रमाणात केला जात आहे असे दिसून येते.

**पश्चिम पाकिस्तानात कृषितंत्रात हा जो बदल झाला आहे, त्याचा लाभ बव्हंशी कापूस, ऊस यांसारख्या व्यापारी पिकांनाच मिळाल्याचे दिसते.**

कापसाचे उत्पादन १९५९–६० साली २,८७,००० हजार टन होते, ते १९६३–६४ सालात ४,१२,००० टन झाले. किंबहुना, या काळात पाकिस्तानात व्यापारी पिकांच्या उत्पादनवाढीचा दर अन्नधान्याच्या उत्पादनवाढीच्या दराच्या जवळ जवळ दुप्पट राहिलेला आहे. कृषिउत्पादनवाढीच्या दरात दिसून येणारा प्रवेग हा प्रामुख्याने या व्यापारी पिकांच्या क्षेत्रातला आहे.

पश्चिम पाकिस्तानच्या शेतीविकासाला नलिकाकूपांमुळे मुख्य चालना मिळाली. ह्या नलिकाकूपांच्या संख्येत जी मोठी वाढ दिसते तिची मुख्य प्रेरणा वीज पुरवठ्याचा झालेला प्रसार ही होती असे दिसते. त्याला सरकारी आर्थिक धोरणातील मूलभूत बदल कारणीभूत झालेला दिसत नाही. पश्चिम पाकिस्तानात नुकत्याच झालेल्या एका पाहणीच्या आधारे केलेल्या पुढील [प्रतिपादनावरून ही गोष्ट स्पष्ट होईल.

"दोन भागांत नलिकाकूपांचे केंद्रीकरण दिसून येते. त्यांपैकी एक भाग मुलतान आणि मॉंटगोमेरी जिल्हे हा. या भागात १९६०–६१ साली विजेचा पुरवठा करण्यात आला. या दोन जिल्ह्यांत मिळून १९६३ सालच्या मध्यापर्यंत ९२०० नलिकाकूप होते. दुसरा भाग गुजराणवाला आणि सियालकोट जिल्हे हा. या जिल्ह्यांना १९५८–५९ या सालात विजेचा पुरवठा करण्यात आला. या पाहणीच्या वेळेला या भागात एकूण ६७०० नलिकाकूप आढळले. इतर महत्त्वाचे भाग म्हणजे लाहोर, झान आणि ल्यालपूर हे जिल्हे होत. या भागात ४,२०० कूप आहेत. या जिल्ह्याच्या काही भागांना वीजपुरवठा झालेला आहे आणि बहुधा हेच येथील कूपांच्या मोठ्या संख्येचे कारण आहे. पश्चिम पाकिस्तानात एकूण २५,००० नलिकाकूप आहेत. त्यांपैकी २०,००० कूप वरील सात जिल्ह्यांतच आढळतात. विजेच्या पुरवठ्यामुळे काही शेतकऱ्यांना नलिकाकूपांचा चांगला फायदा उठविता आला. नलिकाकूपांपासूनच्या फायद्याचे हे प्रात्यक्षिक पाहून इतर शेतकऱ्यांनी विजेची लाईन नाही मिळाली तरी कूप खणले आणि त्यांवर डिझेल इंजिने बसविली. त्यातून असे लक्षात आले की, डिझेल इंजिनावरदेखील कूप चांगला फायदा देतो. त्यानंतर बऱ्याच शेतकऱ्यांनी भराभर डिझेल इंजिनांवर नलिकाकूप चालू केले आणि त्यांची संख्या झपाट्याने वाढत गेली." [ गुलाम मोहम्मद, "प्रायव्हेट ट्यूबवेल डेव्हलपमेंट अँड क्रॉपिंग पॅटर्न्स इन वेस्ट पाकिस्तान," **द पाकिस्तान डेव्हलपमेंट रिव्ह्यू**, खंड ५, क्र. १, वसंत १९६५]

एकूण खणलेल्या कूपांपैकी दोन पंचमांशाहून जास्त नलिकाकूप पन्नास किंवा

अधिक एकरवाल्या जमीनमालकांनी खणून घेतले. एक तृतीयांश कूप २५ ते ५० एकरवाल्या जमीन मालकांनी खोदले. एकूण कूपांपैकी चार पंचमांश कूप शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारे कर्ज न काढता स्वतःच्या खर्चाने खोदले. **यावरून असे दिसून येते की या काळात पश्चिम पाकिस्तानात घडून आलेली प्रगती ही मोठ्या व सधन शेतकऱ्यांच्या आश्रयाखाली घडून आली.**

येत्या काही वर्षांत या भागात अधिक वेगाने या दिशेने विकास घडून येईल अशी शक्यता आहे. पश्चिम पाकिस्तान जल आणि विद्युत-शक्ती विकास महामंडळाजवळ जमिनीत साचलेल्या पाण्याचा निचरा करण्याची आणि क्षार नियंत्रण करण्याची एक सर्वंगामी योजना (मास्टर प्लॅन) आहे. या योजनेत ज्या भागात नलिकाकूप अजून खणले गेले नाहीत अशा ठिकाणी कूप खोदण्याचा कार्यक्रम समाविष्ट आहे. ही योजना जर अंमलात आणली तर या विभागात शेती उत्पादनात खरोखरच मुसंडी मारता येईल असे वाटते. परंतु आतापर्यंत झालेल्या प्रगतीच्या आधारे निष्कर्ष काढायचा झाला तर पाकिस्तान शेतीत घोडदौड करीत आहे असे म्हणणे घाईचे ठरेल.

वस्तुतः पश्चिम पाकिस्तानला लागून असलेल्या भारतातील प्रदेशात शेती उत्पादनवाढीचा दर गेल्या दहा वर्षांत खूप अधिक राहिला आहे. १९५२–५३ ते १९६४–६५ या काळात पूर्व पंजाबात सर्व प्रकारच्या धान्योत्पादनात दरसाल ४½ टक्के चक्रवाढ दराने वाढ, गव्हाच्या उत्पादनात दरसाल ५½ टक्के दराने आणि कपाशीच्या उत्पादनात दरसाल ७ टक्के दराने वाढ झाली आहे. पूर्व पंजाबातील वाढीच्या या उच्च दरांची कारणे म्हणजे अधिक जमीन लागवडीखाली आणली गेली. त्याचप्रमाणे कालव्याचे पाणी जास्त जमिनीला मिळू लागले, ही होत. पश्चिम पाकिस्तानप्रमाणेच येथेही जमीन पाणथळ बनणे, क्षार वाढून त्या खाजण बनणे, या समस्या गंभीर आहेत. पूर्व पाकिस्तानला लागून असलेल्या पश्चिम बंगाल या राज्यात तांदुळाच्या उत्पादनवाढीचा वेग त्या मानाने मंद आहे. (दरसाल १·४ टक्के); परंतु पूर्व पाकिस्तानात उत्पादनवाढीचा वेग यापेक्षा फारसा वर नाही (दरसाल १·६ टक्के.) पश्चिम बंगालमध्ये वाढ मंद असण्याचे मुख्य कारण म्हणजे तांदुळाची जमीन अधिकाधिक प्रमाणात तागासाठी वापरली जात आहे. (या काळात भारतात तागाच्या उत्पादनात ५ टक्के चक्रवाढ दराने वाढ झाली आहे.)

खरे पाहिले तर या काळात पाकिस्तानात शेतीपेक्षा कारखानदारी उद्योगधंद्यांच्या उत्पादनवाढीचा दर खूप उच्च राहिला. वस्तुतः याच विभागात १९६० नंतरच्या काळात नवीन शासनाने केलेल्या धोरणविषयक बदलाचे उल्लेखनीय परिणाम दिसतात. परंतु या बाबतीतही पाकिस्तानच्या या काळातल्या अनुभवावरून पुढील अंदाज बांधताना काळजी घेणे आवश्यक आहे.

अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे, मुळात पाकिस्तानात फार थोडे कारखानदारी

उद्योगधंदे होते. १९५०–५१ मध्ये मोठ्या कारखानदारी उद्योगधंद्यांपासूनचे उत्पन्न एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त १½ टक्के होते. (भारतात ते ६ टक्के होते.) त्यामुळे पहिल्या काही वर्षांत झालेली वाढ टक्केवारीत खूप जास्त दिसावी ही गोष्ट फारशी विस्मयजनक नाही. १९५९–६० या वर्षात कारखानदारी उद्योगधंद्यांचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा शेकडा ५ पर्यंत गेला आणि १९६४–६५ मध्ये तो जवळपास शेकडा ७½ इतका झाला. १९५९–६० नंतरच्या पाच वर्षांत या विभागाची वाढ दरसाल १३½ टक्के या दराने झाली आणि या उच्च दराचे काही स्पष्टीकरण दिले पाहिजे.

याचे स्पष्टीकरण पाकिस्तानातील उद्योगधंद्यांची मूळ रचना आणि त्यांच्या विकासाचा नंतरच्या काळातील घाट यात आढळून येईल. स्वातंत्र्यपूर्व काळातच भारतात देशातील कच्चा माल वापरून उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणारे अनेक उद्योगधंदे सुरू झालेले होते. परंतु अशा प्रकारचे उद्योगधंदे पाकिस्तानात सुरुवातीला जवळजवळ नव्हतेच. एकीकडे संरक्षित बाजारपेठ आणि दुसरीकडे वस्तूंचा अतिशय तुटवडा यांमुळे अशा उद्योगधंद्यांचा अतिशय झपाट्याने विस्तार करणे पाकिस्तानला सहज शक्य झाले आणि या उद्योगधंद्यांच्या वाढीचा दरही ह्यामुळे सतत बराच उच्च राहू शकला. भारतात ही गोष्ट घडणे अशक्य होते.

उदाहरणार्थ, पाकिस्तानात गिरण्यांमध्ये तयार होणाऱ्या कापडाचे उत्पादन १९५० मध्ये फक्त १० कोटी वार इतके होते. १९५९ मध्ये ते ६० कोटी वार इतके झाले. परंतु असे असूनही, ते सर्व कापड फक्त देशातील गरज भागविण्यासाठी वापरूनसुद्धा, प्रतिवर्षी फक्त सुमारे सात वार कापड प्रत्येक माणसाच्या वाट्याला येत होते. १९६५ साली हे उत्पादन ७६ कोटी वार झाले, परंतु तरीही १९५० साली भारतात प्रत्येक माणसाच्या वाट्याला येणाऱ्या कापडापेक्षा पाकिस्तानातला वाटा कमीच होता. भारतात पहिल्या योजनेच्या काळात उत्पादनात शेकडा ४० वाढ झाली. पण तेवढ्याने १० ऐवजी १६ वार कापड दरडोई उपलब्ध झाले. या नंतरच्या काळात कापडाची मागणी पूर्वीच्या प्रमाणात वाढली नाही आणि त्यामुळे उत्पादनाच्या वाढीवर मर्यादा आली.

• रेडिओ सेल्स व सर्व्हिस
• इन्डोअर व औटडोअर फोटोग्राफी
• वाजवी दर • मनपसंत काम
**रेडिओ फोटो हाऊस,**
३७७ शुक्रवार पेठ, शाहू चौक, पुणे २

पाकिस्तानात उत्पन्न होणाऱ्या कच्च्या मालावर चालणारे इतर उद्योगधंदे– उदाहरणार्थ, साखर, खाद्यतेले, ताग, वगैरे–याच कारणाने या काळात झपाट्याने वाढले. भारतातील या प्रकारचे उद्योगधंदे (म्हणजे कापूस, ताग, साखर आणि चहा) स्वातंत्र्यपूर्व कालावधीतच स्थिरावलेले होते आणि त्यामुळे १९५५ ते १९६५ या काळात त्यांच्यांत दरसाल फक्त ३ टक्के वाढ झाली. पाकिस्तानात नेमक्या याच आणि यांसारख्या इतर उद्योगधंद्यांनी झपाट्याने झालेल्या औद्योगिक वाढीतला मोठा वाटा उचलला.

मात्र, पाकिस्तानचा एकूण औद्योगिक विकास फक्त देशात उत्पन्न होणाऱ्या शेतीतील कच्च्या मालावर चालणाऱ्या उद्योगधंद्यांपुरता मर्यादित राहिला आहे असे समजणे चुकीचे ठरेल. असे दिसून येते की, जकातीच्या संरक्षक तटबंदीआड आयात होणाऱ्या मध्यम, अर्ध-संस्कारित वस्तूंवर (इंटरमिजिएट गुड्स्) अवलंबून असलेले काही उद्योगधंदे सुरू झाले. १९५४–५५ इतक्या अगोदरच्या वर्षातही कारखानदारी उद्योगधंद्यांतून निर्माण होणाऱ्या मूल्यांपैकी (अॅडेड् व्हॅल्यू) जवळ-जवळ $\frac{1}{4}$ भाग रसायने, रासायनिक उत्पादने, पायाभूत धातू (बेसिक मेटल्स), विद्युत् साहित्य, धातुविरहित खनिज पदार्थ, यंत्रसामग्री, वगैरे उद्योगधंद्यांतून निर्माण होत होता. १९५९–६० साली त्यांचा हिस्सा $\frac{1}{5}$ पेक्षा जास्त होता आणि १९६३–६४ सालात तो $\frac{1}{3}$ भाग होता.

पाकिस्तानातील उद्योगधंद्यांची परकीय हुंडणावळीची गरज आणि ती भागविण्याच्या बाबतीत वेळोवेळी पडलेल्या मर्यादा यांवर तेथील औद्योगिक वाढीचा सर्वसाधारण दर महत्त्वाच्या प्रमाणात अवलंबून राहिला आहे. १९५०–५५ पर्यंत, म्हणजे ज्या काळात पाकिस्तानची परकीय हुंडणावळीची गरज एकूण आकड्याच्या हिशेबात फारशी मोठी नव्हती आणि शेतीतील कच्च्या मालावर चालणारे उद्योगधंदे औद्योगिक वाढीच्या वाटचालीत आघाडीवर होते, त्या काळात बहुतेक वर्षी वाढीचा दर दरसाल शेकडा २० किंवा अधिक होता. परंतु १९५६ पासून पुढे निर्यातीचे उत्पन्न घटू लागले आणि या उद्योगांची परकीय हुंडणावळीची किमान गरज पुरविणेही जड जाऊ लागले. तेव्हा वाढीच्या दरात एकदम घट झाली आणि तो दरसाल शेकडा ५ ते ७ इतका खालावला. शिवाय या काळात शेती उत्पादन-वाढ होण्याचे जवळजवळ थांबले होते. त्याचाही थोडासा परिणाम या वाढीच्या दरावर झाला असावा. पाकिस्तानात स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक वाढीचा सर्वांत कमी दर १९५९–६० या साली आढळतो. परंतु, नंतरच्या काळात कृषि उत्पादनात झालेली वाढ आणि मध्यम अर्ध-संस्कारित वस्तूंची सढळ आयात यांमुळे औद्योगिक वाढीला परत एकदा जोरदार गती मिळाली, आणि यामुळेच नवीन सरकारने बदललेल्या धोरणामुळे औद्योगिक वाढीच्या दरात नाट्यपूर्ण वाढ झाली असल्याचा देखावा १९६० नंतर निर्माण झाला आहे.

**नवीन सरकारने केलेली सर्वांत महत्त्वाची उपाययोजना म्हणजे परदेशी आयातीला दिलेली विपुल मोकळीक होय. या धोरणाच्या सर्वगामी परिणामांची कसून छाननी करणे** आवश्यक आहे. उदार आयातीचे धोरण दोन टप्प्यांतून पार पाडले गेले. प्रथम १९६३ मध्ये चालू आयात निर्बंधांच्या चौकटीतच अधिक मोठ्या रकमा मंजूर केल्या गेल्या. नंतर १९६४ मध्ये कोणत्याही परवान्याशिवाय आयात करता येतील अशी वस्तूंची एक खुली यादी जाहीर करण्यात आली. त्यात विविध प्रकारचा कच्चा माल, भांडवली वस्तू, " जरुरीच्या उपभोग्य वस्तू, " वगैरे पन्नासांवर वस्तूंचा समावेश होता. (भारतात आयातनिर्बंध शिथिल करण्यासाठी सरकारने याच प्रकारची उपाययोजना नुकतीच अंमलात आणली आहे ही गोष्ट येथे सांगण्यासारखी आहे. यादीत समावेश केलेल्या वस्तूंच्या बाबतीतही पाकिस्तानमधील यादीशी बरेच साम्य आढळते.)

आपण अगोदरच बघितले त्याप्रमाणे, या मुक्त आयातीचा एक परिणाम म्हणजे औद्योगिक वाढीला जोराची गती मिळाली. अर्थात याच वेळी शेतीउत्पादनात जोराची वाढ घडून आली, त्यामुळे औद्योगिक वाढीला मिळालेल्या चालनेत उदार आयातीचा वाटा किती असावा हे सांगणे कठीण आहे. मात्र या धोरणाचा दुसरा परिणाम असा झाला की, **पाकिस्तानच्या आयात–निर्यातीच्या व्यवहारातील तूट बरीच मोठी झाली.**

१९५९–६० साली पाकिस्तानात एकूण २४६ कोटी रुपयांची आयात झाली तर १८४ कोटी रुपयांची निर्यात झाली. १९५९–६० ते १९६४–६५ या काळात आयातीत १२० टक्के वाढ होऊन ती एकूण ५३७ कोटी रुपयांची झाली, तर निर्यात फक्त ३० टक्के वाढली. त्याचा परिणाम म्हणून १९५९–६० साली वस्तूंच्या आयात–निर्यात व्यवहारांतील तूट ६२ कोटी रुपये होती ती १९६४–६५ मध्ये ३०० कोटी रुपयांवर गेली. ( या काळात पाकिस्तानच्या निर्यातीच्या वाढीचा दर भारताच्या निर्यातीच्या वाढीच्या दरापेक्षा जास्त नव्हता.)

बऱ्याच प्रमाणात वाढलेल्या या आयातीचा म्हणावा तसा परिणाम आयात वस्तूंच्या किमतींवर झाला नाही असे दिसते. देशात या वस्तूंची मागणी बऱ्याच प्रमाणात वाढली होती आणि त्यामुळे पुरवठा वाढला तरी अखेर त्यांच्या किमतींवर लक्षात येण्याइतका परिणाम झाला नाही. खुल्या यादीतील वस्तूंच्या बाजारभावाच्या पाहणीवरून असे दिसून आले आहे की, १९६४ नंतर यादीमधल्या एकूण वस्तूंपैकी थोड्या वस्तूंच्या किमती खाली आल्या तर बऱ्याच वस्तूंच्या किमती स्थिर राहिल्या आणि काही वस्तूंच्या किमती चांगल्याच वाढल्या.

१९६४ च्या मध्यावर आयात वस्तूंच्या (पाकिस्तानात पडणाऱ्या खरेदी किंमतीवर) विक्रीतून होणारा सरासरी फायदा शेकडा ६० इतका मोठा होता ही गोष्ट नमूद करण्याजोगी आहे. पुढे आयातीचे प्रमाण वाढले आणि आयातीवरील जकात

वाढली, तरीसुद्धा पश्चिम पाकिस्तानात १९६५ साली आयात वस्तूंची विक्री किंमत सरासरी ४६ टक्क्यांनी (पाकिस्तानात पडणाऱ्या खरेदी किमतींच्या) अधिक होती.

आयात निर्बंध शिथिल केल्याचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे दुसऱ्या योजनेच्या पहिल्या चार वर्षांत सर्व उद्योगधंद्यांत, विशेषतः भांडवली वस्तु-उद्योगधंद्यांत, **परदेशी आयात वस्तूंच्या जागी स्वदेशी वस्तूंचा वापर करण्याचे (इंपोर्ट सब्स्टिट्यूशन) प्रमाण एकदम खाली आले.** २६ उद्योगधंद्यांची पाहणी केली तेव्हा असे आढळून आले की, १९५४–५५ ते १९५९–६० या कालावधीत उत्पादनातील वाढीच्या ¼ वाढ आयात वस्तूंच्या ऐवजी देशात तयार केलेल्या वस्तूंच्या रूपात होती, आणखी ¼ वाढ निर्यातीतील वाढीमुळे झाली होती. उरलेल्या फक्त निम्म्या वाढीचे कारण देशातील वाढलेली मागणी हे होते. पुढील चार वर्षांत आयात वस्तूंऐवजी देशात तयार करावयाच्या वस्तूंचे उत्पादन ' उणे ' झाले; म्हणजे, आयात वस्तूंच्या जागी देशात वस्तू बनविल्याने त्या प्रमाणात उत्पादन-वाढ होण्याऐवजी परदेशी वस्तूंचा वापर झाल्याने त्यांच्या आयातीसाठी द्यावे लाग-णारे परकीय चलन उत्पादनवाढीतील काही वाढ खाऊन जाऊ लागले. निर्यात-वाढीमुळे होणाऱ्या वाढीचे प्रमाण ५ टक्क्यांपेक्षाही कमी झाले आणि देशातील मागणी वाढल्यामुळे ९५ टक्क्यांपेक्षा अधिक वाढ उत्पादनात झाली. १९५९–६० च्या अगोदरच्या पाच वर्षांत भांडवली व तत्संबधित वस्तू निर्माण करणाऱ्या उद्योग-धंद्यांतील उत्पादनवाढीत आयात वस्तूंच्या जागीच्या स्वदेशी निर्मितीचा हिस्सा २७ टक्के होता तो १९५९–६० नंतरच्या काळात **उणे दहा** टक्क्यांपर्यंत खाली आला.

**यावरून हे स्पष्ट होते की, आयात निर्बंध शिथिल केल्याने औद्योगिक वाढीला जोराची गती मिळाली असली तरी परकीय मदतीवरील फार मोठ्या प्रमाणातील अवलंबनाच्या रूपाने त्यासाठी किंमत दिली गेली.** औद्योगिक क्षेत्रात, विशेषतः भांडवली वस्तु-उद्योगांमध्ये आयात वस्तूंच्या जागी स्वदेशी वस्तूंचा वापर वाढ-ण्याचा दर खूप खाली आणण्याच्या रूपाने ही किंमत दिली गेली आहे. परकीय मदतीवर कोणत्या मर्यादेपर्यंत अवलंबून राहावे लागत आहे हे पुढील माहितीवरून लक्षात येईल. देशाची स्वतःची परकीय हुंडणावळीची मिळकत आणि एकूण परकीय देणे यांच्यांतील फरक, जो मदतीतून भागवावा लागला, १९६०–६१ मध्ये देशाच्या समस्त राष्ट्रीय उत्पादनाच्या शेकडा ३ पेक्षा कमी होता, तो १९६३–६४ मध्ये शेकडा ५ च्या वर आणि १९६४–६५ मध्ये शेकडा ६ च्याही वर गेला.

थोडक्यात सांगायचे तर, गेल्या पाच वर्षांत पाकिस्तानने आर्थिक वाढीचा खूप उच्च दर गाठला आहे ही गोष्ट निःसंशय सत्य आहे. या काळात झालेली प्रगती काही दृष्टचा अतिशय महत्त्वाची आहे आणि तिची किंमत कमी लेखणे बरोबर नाही. उदाहरणार्थ, पश्चिम पाकिस्तानात शेतीच्या उत्पादनाची वाढ बराच काळ

खुंटलेली होती तिला एकदा चालना मिळाली आहे, आणि ह्या विभागातली वाढीची प्रक्रिया पुढच्या काही वर्षांत अधिक वेग घईल अशी शक्यता आहे. त्याचप्रमाणे, १९५०–५५ पर्यंत मोठ्या कारखानदारी उद्योगधंद्यांतून निर्माण होणारे उत्पन्न एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १½ टक्के होते ते आता ७½ टक्क्यांवर गेले आणि आता हा विभाग भारताप्रमाणेच पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेतील एक प्रमुख विभाग बनला आहे.

असे असले तरीही, अलीकडील वर्षांत पाकिस्तानात जी प्रगती झाली तिचे वर्णन 'अद्‌भुत' या शब्दाने करणे फार अतिशयोक्तीचे होईल. त्याचप्रमाणे, पाकिस्तानातील घडामोडी हे "स्वावलंबी स्वयंचलित वाढीच्या दिशेने वाटचाल कशी करावी त्याचे एक नमुनेदार उदाहरण आहे" असा जो दावा केला जातो तोही बरोबर म्हणता येत नाही. या काळात पाकिस्तानात झालेली प्रगती अतिशय मोठ्या प्रमाणावर मिळणाऱ्या परदेशी मदतीवर विसंबून झाली. **स्वावलंबी, स्वयंचलित आर्थिक वाढीकरिता जी मूलभूत परिस्थिती अस्तित्वात असावी लागते ती अजूनही पाकिस्तानात निर्माण व्हायची आहे, असेच म्हणावे लागेल.**

१९५१ ते १९६५ या काळात सुमारे ४७० कोटी डॉलरची मदत पाकिस्तानला उपलब्ध करून देण्यात आली. पण १९५१ ते १९६१ या दहा वर्षांच्या काळात यातील फक्त सुमारे १६० कोटी डॉलरची मदत प्रत्यक्षात दिली गेली. याचा अर्थ १९५५ नंतरच्या काळात सुमारे ३१० कोटी डॉलर मदत देण्यात आली. पाकिस्तानची आजची लोकसंख्या पाहता ही मदत दरडोई ३० डॉलर पडते. (भारताला १९५० ते १९६५ च्या सप्टेंबरपर्यंत एकूण ११२० कोटी डॉलरची परकीय मदत उपलब्ध झाली. त्यातील ५३० कोटी डॉलर १९६१ च्या एप्रिलनंतर प्रत्यक्षात मिळाली. याचा अर्थ आताच्या भारताच्या लोकसंख्येच्या हिशेबाने १९६१ नंतरच्या पाच वर्षांतील मदतीचे प्रमाण दरडोई फक्त १० डॉलर पडते.)

ह्या मदतीत पाकिस्तानला या काळात मिळालेली लष्करी मदत धरलेली नाही. ह्या मदतीचे आकडे फारसे उपलब्ध नाहीत. एका अंदाजाप्रमाणे १९६० पर्यंत मिळालेली मदत ३० कोटी डॉलरच्या घरात जाईल. १९५४ पासून पाकिस्तानला लष्करी मदत मिळू लागली. यावरून, गेल्या दहा वर्षांच्या काळात पाकिस्तानला मिळालेली मदत ६० कोटी डॉलरपेक्षा कमी तरी नसावीच. (१९६० नंतर, आर्थिक मदतीप्रमाणे मदतीचे प्रमाण वाढले असले तर कदाचित एकूण लष्करी मदत यापेक्षाही जास्त असेल.)

लष्करी मदत आर्थिक मदतीला पूरक म्हणून देण्याची अमेरिकेची कल्पना होती हे आपल्याला प्रोफेसर मॅसन यांच्या पुढील उद्गारांहून सहज कळून येते. (प्रोफेसर मॅसन पाकिस्तानला मदत देण्याविषयीचे धोरण आखणाऱ्यांपैकी एक होते.)

" काही मर्यादेपर्यंत आर्थिक विकास आणि लष्करी सहाय्य या दोन बाबींमध्ये

परकीय मदतनिधीतील वाटयासाठी स्पर्धा असते. त्यामध्ये बहुधा लष्करी सहाय्याच्या पक्षाची सरशी होते, कारण लष्करी तज्ज्ञांनी लष्करी सहाय्याच्या गरजेविषयी मांडलेले मत खोडून काढणे अमेरिकन काँग्रेसला अवघड जाते. त्या मानाने अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक गरजेविषयीच्या मताला हरकत घेणे तितकेसे अवघड जात नाही. पण मदत मिळणाऱ्या राष्ट्रांच्या दृष्टीने या दोन मदती एकमेकींना पूरक ठरू शकतात. लष्करी तयारीसाठी बांधलेले रस्ते आणि पूल हे मुलकी गरजेकरितासुद्धा उपयुक्त ठरतात, आणि योजनापूर्ण आखणी केली तर लष्करी गरजेपेक्षाही मुलकी गरजा त्यातून अधिक भागू शकतात, हे स्पष्ट आहे. त्याचप्रमाणे, आर्थिक भरभराटीमुळे लष्करी सामर्थ्य प्रत्यक्षतः आणि संभाव्यतःदेखील वाढते. प्रत्यक्षात त्यांची परस्परपूरकता याहीपेक्षा जास्त असते."

"आपण ज्या देशांना मदत करतो त्यांपैकी बऱ्याच देशांत लष्कर ही सर्वोत्तम संघटना आहे, आणि बऱ्याच वेळेला लष्कर ही त्या देशातील एक भविष्योन्मुख,


ज्वलंत राष्ट्रवादाच्या
भयानक दीप्तीचा
ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,
४१९ नारायण पेठ, पुणे २.

पुरोगामी शक्तीही असते. पाकिस्तानात ही गोष्ट अगदी उघडपणे दिसते. याविषयी अमेरिकन लष्करी मदत योजनेचे अधिकारी पण अधिकाधिक जागरूक होत आहेत, आणि त्या देशांतील अमेरिकन मदतयंत्रणा संख्या व गुण या दोन्ही दृष्टींनी बळकट केल्यामुळे लष्करी व आर्थिक मदत परस्परपूरक बनण्याच्या दृष्टीने पुढेच पाऊल टाकले गेले आहे..." [एडवर्ड एस्. मॅसन, "फॉरिन एड अँड फॉरिन पॉलिसी (१९६४) पृ. २०, २१.]

म्हणून पाकिस्तानला मिळालेल्या मदतीची समग्र कल्पना येण्यासाठी या दोन्ही प्रकारची मदत लक्षात घ्यायला हवी.


येथे हे नमूद करणे अत्यावश्यक आहे की, बऱ्याच वेळेला भारत आणि पाकिस्तानातील वाढीच्या दरांची जी तुलना केली जाते ती एक तर अर्थपूर्ण नसते आणि बऱ्याच वेळेला तर गैरसमज करून देणारी असते. कारण गेल्या पाच वर्षांत पाकिस्तानात ज्या घडामोडी घडल्या, जी प्रगती झाली, तिची तुलना भारतातल्या प्रथम पंचवार्षिक योजनेच्या काळात घडलेल्या घडामोडी आणि प्रगती यांच्याबरोबर करणे अधिक युक्त होईल. भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातच औद्योगीकरणाच्या दृष्टीने भरीव पायाभरणी झाली होती हे लक्षात घेता, थोड्याच कालावधीत आर्थिक प्रगतीच्या या टप्प्यापर्यंत आल्याबद्दल पाकिस्तानची प्रशंसा करायला हवी; परंतु हेही लक्षात ठेवायला हवे की, १९५६ नंतरच्या काळात भारत ज्या मार्गाने वाटचाल करीत आहे त्या मार्गावर पाकिस्तान आता प्रस्थान ठेवण्याच्या बेतात आहे. आता, या टप्प्यावर पोचल्यावर ज्या समस्या उभ्या राहतात त्यांना पाकिस्तान किती यशस्वीपणे तोंड देऊ शकते ते अजून बघायचे आहे.

भविष्यकाळात पाकिस्तानच्या आर्थिक वाढीच्या शक्यतेविषयी अंदाज घेताना त्याच्या लष्करी खर्चाच्या वाढत चाललेल्या बोजाचे होणारे संभाव्य परिणाम लक्षात घतले पाहिजेत. आतापर्यंत पाकिस्तानला सुदैवाने मोठ्या प्रमाणावर लष्करी मदत मिळत आली आहे. त्यामुळे त्याच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा अतिशय छोटा भाग (३ टक्क्यांपेक्षा कमी) लष्करासाठी खर्च करून भागले. अगदी अलीकडील अंदाजपत्रकावरून लष्करी खर्चात बरीच वाढ केलेली दिसून येत आहे. शक्यता अशी दिसते की, लवकरच पाकिस्तानचा संरक्षण खर्च चिनी आक्रमणानंतरच्या भारताच्या वाढलेल्या खर्चाच्या प्रमाणाइतका होईल.

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांचा भविष्यकाळ, म्हणून, काहीसा अनिश्चित आहे. गेल्या पाच वर्षांत पाकिस्तानातील वाढीचा दर बराच उच्चीचा राहिला. हा उच्च दर बऱ्याच अंशी काही अनुकूल योगायोगांवर अवलंबून होता असे दिसते. ही अनुकूल परिस्थिती पुढे चालू राहीलच असे मानण्यास काहीही आधार नाही. भारताप्रमाणेच, वाढत्या संरक्षण खर्चाचा पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होण्याचा संभव आहे. १९६५–६६ हे अपवादात्मक वर्ष वगळले

तर, भारतातील वाढीचा दर हा पाकिस्तानातल्या वाढीच्या दराइतकाच उच्च राहिला असे दिसते. (दोन्ही देशांच्या बाबतीत १९५९–६० ते १९६४–६५ या कालावधीत गाठलेला वाढीचा दर अपवादात्मक असून दूरदृष्टचा त्याचे फारसे महत्त्व नाही.) परंतु भारतसुद्धा आज इतक्या मोठ्या प्रमाणावर परकीय मदतीवर अवलंबून आहे की, आपण स्वावलंबी, स्वयंचलित विकासाच्या टप्प्याजवळ आलो आहे असा दावा करणे अशक्य आहे. भारत आणि पाकिस्तान हे परकीय मदतीवर ज्या प्रमाणात अवलंबून आहेत त्यांमध्ये थोडासा फरक आहे. तरीपण, परकीय मदतीवरील अवलंबन ही दोन्ही देशांपुढील प्रधान समस्या इतकी कठीण होऊन बसली आहे की, त्यांच्या नजीकच्या भवितव्याविषयी अंदाज करणे अतिशय अनिश्चित होऊन बसले आहे. चीनमध्ये, या दृष्टीने पाहता, अतिशय वेगळे व विरोधी दृश्य दिसते. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांनी आर्थिक धोरणाबाबतीत चीनपासून कोणता धडा घ्यावा त्याचा ऊहापोह मी पुढच्या लेखात करणार आहे.

[ ' समाजप्रबोधन पत्रिका '
जून : जुलै १९६८
अंकावरून पुनर्मुद्रित.
भाषांतर : जयश्री कर्णिक ]
उत्तरार्ध पुढील अंकी



# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

दि. ३ ते ९ ऑगस्टचे भविष्य

**मेष :** सूर्य-मंगळ दोन्हीही उग्र ग्रह चतुर्थात–परिस्थिती झपाट्याने बिघडू लागलेली आहे, याची पदोपदी जाणीव व्हायला लागेल. प्रकृती अस्वास्थ्याबरोबरच सांपत्तिक ताण, नोकरी धंद्यांतील पेचप्रसंगाबरोबरच राहत्या जागेची विवंचना, एक ना दोन अनंत कटकटी हात धुवून पाठीशी लागतील, त्यातून साडेसातीची लटकती तरवार सतत जाणवत राहील.

ऑगस्टचे पहिले ८–१५ दिवस आपणास थोडे जपूनच काढायला हवेत. या वेळी तुम्हाला सतत उपयोगी पडेल तुमची निष्ठा–तुमचा निर्धार.

वेळ निभावून जाईल पण प्रत्येक गोष्टीसाठी जिवाचे रान करावे लागेल. फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका, लोकांच्या अभिवचनावर विसंबून राहू नका.

दि. ५ ते ८ ऑ. या काळांत खूपच धावपळ, धडपड करावी लागेल.

**वृषभ :** पराक्रमांत फारमोठे पराक्रमी ग्रह हा मणिकांचन योगच. अशी ग्रहस्थिती क्वचित प्रसंगी वाट्यास येते आणि म्हणूनच ती काहीतरी अचाट कार्य करण्यास प्रवृत्त करते.

या वेळी शनी बारावा आहे का गुरू चौथा आहे हे पाहण्याची तुम्हाला गरजच भासणार नाही. ग्रहांनी अनुकूल कौल दिलाच आहे, प्रयत्न अल्पसा केला तरीही अनन्यसाधारण यशाचे धनी व्हाल.

या आठवड्यात वरचेवर प्रवास घडेल आणि त्या प्रवासामुळेच तुमचे अचाट कर्तृत्व जगाच्या निदर्शनास येईल.

पैसा माफकच मिळल पण प्रसिद्धी फार मोठी लाभेल, उद्योगधंद्याचे नवे तंत्र परिणामकारक ठरल्याचा प्रत्यय यायला लागेल. कलाक्रीडाक्षेत्रांत विक्रमी यश मिळवाल.

दि. ७ ते ९ या काळाची नोंद करा.

**मिथुन :** केवळ सांपत्तिक दृष्टीने या वेळच्या ग्रहस्थितीचे मूल्यमापन केलेत तर निराशाच पदरी पडेल. पण सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय सत्ता, साहित्यातील लोकप्रियता या दृष्टीने हे दिवस आपणास चिरस्मरणीय जाणवतील. एकादशातील शनी आणि तृतीयातील गुरु–शुक्र यांच्याच हाती तुमचे भवितव्य आहे. आणि

शिकस्तीचा प्रयत्न करून ते तुमचे चारित्र्य उज्ज्वल करण्याचा प्रयत्न करतील.

नव्या योजना आकार घेऊ लागतील. व्यवसायधंद्यांत काही भव्यदिव्य घडवून आणण्याचे तुमचे विचार याच वेळी प्रत्यक्ष कृतीत उतरतील, धनिकाचे सहाय्य लाभेल, राजकीय वर्तुळातील बड्यांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभू शकेल.

दि. ५ ते ८ या काळाची नोंद ठेवा.

कर्क : रवी–मंगळ या स्फोटक ग्रहांचे तुमच्या राशीतच वास्तव्य–ते केव्हा काय करतील हे काय सांगावे ? जपून सावध राहण्याचे हे दिवस आहेत यापेक्षा अधिक काय सांगता येणार?

प्रकृती आणि मनस्थिती केव्हाही बिघडण्याची शक्यता आहे. हे ग्रह आपल्या प्रतिष्ठेवर फारसा अनिष्ट परिणाम करतील असे दिसत नाही. पण या चमत्कारिक ग्रहाबद्दल निर्वाळा कसा द्यावा ?

या वेळी तुमच्यातील सहनशक्तीचा कस लागेल; आपण आपल्या व्यवसाय-धंद्याचे बदललेले तंत्रही फारसे यशस्वी झाल्याचा प्रत्यय येणार नाही. काही दिवस ही त्रासदायक परिस्थिती सहन केल्याशिवाय गत्यंतरच नाही.

दि. ३–४–७– ऑ. थोडेफार अनुकूल दिवस एवढेच.

सिंह : व्ययस्थानी ग्रह आले की, अंगावर काटाच उभा राहतो. पैसा दिसेनासा होतो, प्राप्ती मंदावू लागते, प्रकृतीच्या तक्रारी वाढू लागतात आणि आणखीही नको-नको ते घडून यायला लागते. ऑगस्टच्या पहिल्या ८–१० दिवसांत तुमच्या सहन-शक्तीची परीक्षाच आहे. गुरु–शुक्र अनुकूल आहेत या भरवशावर जाऊ नका.

अनाहूत प्रचंड खर्च समोर उभा राहील, देणेकरी अगदी धरणे धरून बसतील, वाढत्या खर्चाला आवर घालण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करूनही–अपयशच पदरी पडेल. या काळात काही न करण्यासारखा शहाणपणा नाही.

उद्योगधंद्यातील आडाखे फसू लागतील, अंदाजपत्रक साफ कोलमडून पडेल, इष्ट-मित्र हातोहात फसवतील, नोकरीधंद्यात प्रगतीतर नाहीच-आहे तिथेच राहिलात तर पुष्कळ मिळवली !

दि. ५–७–८ थोडेफार बरे दिवस.

कन्या : सूर्य मंगळ बुध एकादशात. अशी ग्रहस्थिती लाभली की, अंतरिक्षातील सारे ग्रह खूष असल्याचा प्रत्यय यायला लागतो. या काळी आपण सहज जरी पाऊल टाकले तरी ते पावित्र्यातच पडेल. इतका अनुकूल काल या वर्षातील हाच पहिला.

पैसा अमाप मिळेल, प्रतिष्ठा इतकी उंचावेल की, हिमालयही ठेंगणा वाटावा. नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील, उद्योगधंद्यांचे स्वरूप अधिक व्यापक बनू लागेल.

स्थावराची अडचण मिटेल, वाहनाची सोय होईल, थोड्याशा परिश्रमानेही फार

मोठे यश मिळेल. नव्या व्यवसायधंद्यात पदार्पण करायचे ठरेल.

दि. ४–६–८ या काळी अपेक्षा सफल होतील.

**तूळ :** गेल्या महिन्यासूनच आपले कर्तृत्व चौफेर उधळू लागलेले आहे. या आठवड्यात तर त्याला दाही दिशा अपुऱ्या पडू लागतील. गुरु शुक्र एकादशात आणि सूर्य मंगळ दशमात एवढी चांगली ग्रहस्थिती फक्त भाग्यवानाच्याच वाट्यास येत असते.

- या कालात तुमच्या प्रगतीला उधाण येईल, भाग्याला तुफान होईल, प्रतिष्ठेच्या उंचीला गगन ठेंगणे वाटू लागेल, कार्याची कक्षा विस्तारेल, जे जे व्हावे असे वाटते ते ते सहजासहजी घडून यायला लागेल.

यांत्रिक व्यवसायाशी आपला संबंध असेल तर तो व्यवसाय कल्पनेबाहेर यशस्वी ठरेल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील, मंगलकार्याचेही निश्चित होईल, धनोत्पादनाचे नवे नवे मार्ग दृष्टीक्षपात यायला लागतील.

दि. ५ ते ९ सर्व काल अपेक्षासाफल्याचा जाणवेल.

**वृश्चिक :** सध्या आपल्या भाग्यस्थानी अनेक ग्रह आलेले आहेत – तिथे त्यांचा येण्याचा हेतूच मुळी तुमच्या प्रगतीला उधाण आणणे. त्यांचा हेतु निःसंशय सफल होईल.

वैज्ञानिक – वैद्यकीय, संशोधन तांत्रिक यांपैकी ज्याच्याशी आपला संबंध असेल त्यात आपणास अत्युत्तम यश लाभेल – या आठवड्यापासून आपणास सतत प्रवास करावे लागतील, थोरांच्या कृपेचा प्रत्यय पावलोपावली येईल, नोकरीत सर्वोच्च अधिकार लाभेल, पैसा अमाप मिळल, सामाजिक राजकीय क्षेत्रांतील आघाडीचे स्थान लाभेल.

तात्पर्य तुमच्या जीवनातील परमोत्कर्षाचा काल हाच असे म्हणण्यात अतिशयोक्ती होऊ नये.

दि. ७ । ८ । ९ हे दिवस अधिकाधिक यश पदरी टाकून जातील.

**धनु :** सूर्य मंगळ अष्टमस्थानी असल्यावर भाग्यस्थानच्या गुरूचा भरवसा धरण्यात काय अर्थ आहे ?

सांपत्तिक असह्य ताण, अनारोग्य, शत्रुत्व, कामातील मंदत्व इ. अनेक प्रकार या वेळी अनुभवावे लागतील; काही करीन म्हटले तर ते घडेलच असे दिवस सध्याचे नाहीत. या वेळी काहीसे जपूनच वागायला हवे.

नव्या व्यवसायाच्या जबाबदाऱ्या वाढवून घेऊ नका. भागीदारीने व्यवहार करण्याचे मनातही आणू नका. असे असले तरी अपमान – अपेक्षाभंग – निराशा असे काही मुळीच डणार नाही.

राजकीय व सामाजिक क्षेत्रातही फारच जपून पाऊल टाका.

दि. ७ । ८ । ९ थोडेफार यश मिळावे.

**मकर :** रवि मंगळ सप्तमात असेपर्यंत अपेक्षेप्रमाणे काही घडेल अशी अपेक्षा करण्यातही अर्थ नाही. वैचारिक संघर्ष पदोपदी निर्माण व्हायला लागतील. कौटुंबिक वातावरण त्रस्त व संतप्त बनू लागेल.

सहज काही बोलावे आणि त्याचा विपरीत परिणाम घडावा असे घडत राहील.

या सर्व अनिष्टतेवर एकच एक रामबाण उपाय – मौन हाच ! दूरच्या प्रवासाचे टाळा. नव्या व्यवसायधंद्याला प्रवृत्त होऊ नका. खाण्यापिण्यात संयम बाळगा. प्रगतीची संधी आधी लाभणारच नाही – प्रयत्नानी लाभलीच तर ती हुकणार नाही याची दक्षता बाळगा.

दि. ३ ते ५ काहीसे बरे दिवस.

**कुंभ :** गेल्या कित्येक महिन्यांत लाभलेले नसतील इतके चांगले दिवस सध्या आपणास लाभत आहेत – याचा योग्य तो लाभ उठवलात तर तुमच्या बऱ्याचशा विवंचना मिटून जातील. दशमात आणि एकादशात अनेक मोठाले ग्रह जमलेले आहेत. ते आपल्या प्रगतीची गती वाढवल्याशिवाय राहणार नाहीत.

या आठवड्यापासूनच नव्या आशा अंकुरायला लागतील, भव्य योजना आकार घेऊ लागतील, यांत्रिक व्यवसायधंद्यांत पाऊल पडेल आणि अनेक मार्गांनी हाती पैसा येऊ लागेल.

या कालापासून आपणास कोणत्याही क्षेत्रांत आवाज उठवता येईल. कौटुंबिक वातावरण प्रसन्न दिसू लागेल.

दि. ५ ते ७ विशषत्वाने नोंद करा.

**मीन :** तुमचा सारा अनिष्ट काल इतिहासजमा झाला असे आता निश्चितपणे म्हणता येईल. साडेसातीची दखल घेण्याचीही गरज नाही.

मुख्यत: आरोग्य सुधारेल, सांपत्तिक ताण कमी होईल, डुबलेला धंदा पुन्हा उभारला जाईल, व्यवसाय धंद्याचे स्वरूप आकर्षक बनेल, हुकलेली सधी पुन्हा लाभेल.

आता आपणास निर्धाराने नव्या व्यवसायधंद्यास लागण्यास हरकत नाही, मोठ्या प्रमाणावर पैसा उभारला जाईल, अनेकांच्या मदतीने प्रगतीचा वेग वाढवला जाईल.

असे असूनही – आपण इतक्यातच सामाजिक जबाबदाऱ्या उचलणे इष्ट ठरणार नाही. आपली कुवत पाहून, ताकद अजमावून कार्याला हात घाला.

दि. ३ । ५ । ७ परिश्रम यशस्वी ठरतील.

०

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

आज साम्राज्यवादी धोरणांचा बिनदिक्कत पाठपुरावा करणाऱ्या सोव्हिएट रशियात १९१७ साली खरोखरच काय घडले ?

✻

मार्क्सवादी क्रांती
की
बोल्शेव्हिक हुकूमशाही ?

✻

या गुंतागुंतीच्या प्रश्नांचा मागोवा घेण्याचा एक नम्र प्रयत्न—

✻

# व्होल्गा जेव्हा लाल होते

लेखक : वि. स. वाळिंबे

प्रस्तावना : ना. ग. गोरे

✻

'माणूस'मधून गेले वर्षभर येत असलेली ही वादग्रस्त लेखमाला पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे. तपशील पुढील अंकी.

✻

राजहंस प्रकाशन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.